# संपादकीय

## ग्रंथव्यवहाराचे जागतिकीकरण म्हणजे अमेरिकीकरण ?

एकीकडे पुस्तकांचा खप व वाचनप्रवृत्ती कमी होत आहे अशी हाकाटी सुरू आहे तर दुसरीकडे जागतिक ग्रंथ व्यवहाराचे स्वरूप दिवसेंदिवस व्यापक होत चालले आहे असे आकडेवाऱ्यांवरून कळते. या दोहोंचा मेळ घालायचा तर आपल्या मानसिकतेत बदल व्हायला हवा.

ग्रंथव्यवहाराचे स्वरूप आता बदलत आहे. कागद व मुद्रित शब्द असे त्याचे स्वरूप आता मर्यादित राहिलेले नाही, ई-बुक्स, सीडी रॉम, ऑडिओ-व्हिडिओ कॅसेटस यांच्या रूपातही आता पुस्तके असणार आहेत ही खूणगाठ मनाशी बांधायला हवी. पुस्तकांची संख्या वाढत आहे तशीच त्यांच्या वितरणव्यवस्थेचीही पुनर्रचना सुरू आहे. पुस्तकविक्रीकेंद्रांची संख्याही वाढत आहे. उदारीकरणामुळे सगळे जग हीच आपली बाजारपेठ आहे हे वास्तव सर्वच ग्रंथप्रकाशकांच्या लक्षात आता येत आहे. पूर्वी ते मोजक्या आंतरराष्ट्रीय प्रकाशकांच्याच व्यावसायिक विस्ताराचे आद्यसूत्र होते. या आंतरराष्ट्रीय ग्राहकाला आकृष्ट करतील, विकत घ्यावीशी वाटतील, अशी पुस्तके काढण्याची गरज आता आहे. ही गरज ज्यांना जाणता येईल आणि आपल्या कल्पकतेने भरून काढता येईल त्यांचा भविष्यकाळ उज्ज्वलच असणार आहे. अधिकस्य अधिकं फलम् हे त्यांच्या भावी प्रगतीचे आद्यसूत्र राहणार आहे.

या ग्रंथव्यवहारावर अमेरिकेचा प्रभाव अधिक राहणार आहे. हे आपल्या भारतीय प्रकाशकांपेक्षाही ब्रिटिश आणि युरोपियन प्रकाशकांना जास्त तीव्रतेने जाणवते आहे. जागतिकीकरण म्हणजे त्यांच्या दृष्टीने अमेरिकीकरण असे समीकरण होऊ पाहत आहे. अमेरिकन प्रकाशन संस्था युरोपमधील लहानमोठ्या प्रकाशनसंस्थांचे भागभांडवल हस्तगत करून, त्यांच्या व्यवहारावर अप्रत्यक्षपणे आपली पकड आवळत आहेत. गेल्या काही वर्षात अमेरिकेतील प्रकाशनसंस्थांनी ब्रिटिश व युरोपियन प्रकाशन व्यवसायात भरपूर भांडवल गुंतवले असून, आता एकूणच इंग्रजी ग्रंथव्यवहाराची सूत्रे लंडन किंवा पॅरिस येथून हलवली न जाता, ती न्यूयॉर्कमधून हलवली जात आहेत असे म्हटले तर वावगे होणार नाही.

याचा प्रत्यक्षात परिणाम कसा दिसतो ? याचे पडसाद कसे उमटतात ?

एखादे पुस्तक इंग्लंडमध्ये चांगले खपावे असे वाटत असेल तर ते अमेरिकेतही चांगले खपायला हवे हे या नव्या प्रकाशनसंस्थांपुढे मार्गदर्शक व नियंत्रक सूत्र म्हणून असते. अनेक ब्रिटिश लेखकांनाही त्यामुळे आता केवळ ब्रिटिश वाचक समोर ठेवून लिहून भागत नाही, अमेरिकन वाचक डोळ्यांसमोर ठेवून त्याप्रमाणे शैली व वातावरण यात काही गोष्टी आणाव्या लागतात. त्याचप्रमाणे अमेरिकन पुस्तके ही मोठ्या प्रमाणावर इंग्लंडमध्ये येताना आता अमेरिकन म्हणून न येता इंग्लंडमधील प्रकाशनसंस्थेची म्हणून येतात.

ग्रंथव्यवहाराच्या या नव्या रचनेमुळे इंग्लंडमध्ये वर्षभरात जी पुस्तके बाजारात येतात, त्यातील १५ हजार पुस्तके ही मूळ अमेरिकन प्रकाशकांची व आता संयुक्त प्रकाशनाची म्हणून येतात, त्यामुळे या व्यवसायातील अर्थशास्त्राचे गणितही बदलत आहे आणि पुस्तकांचा खप जास्त



व्हावा म्हणून त्यांच्या प्रसिद्धीचे व प्रसाराचे वेळापत्रक आखताना ते केवळ अमेरिका व इंग्लंडपुरते मर्यादित न ठेवता जागतिक ग्राहक समोर ठेवून आखावे लागत आहे. 'बेस्ट सेलर'च्या यादीत जाऊ शकणाऱ्या पुस्तकांना व लेखकांना त्यामुळे मागणी जास्त आहे. अशा पुस्तकाची कल्पना सुचवल्याबरोबर प्रकाशन संस्था लेखकाला हजारो डॉलर्सचा ॲडव्हान्स देऊन आपल्याकडे ओढून घेतात; आणि त्या पुस्तकाने बेस्ट सेलर म्हणून पहिल्या काही आठवड्यातच प्रचंड धंदा करावा म्हणून मार्केटिंगवर भर देतात.

जॉन लॅकेस्टर या लेखकाशी दोन पुस्तकांबाबत फाबेरने करार केला, आणि त्यासाठी त्याला ३ लाख पौंड (२१० लाख रुपये) देण्याचे मान्य केले- त्यापैकी मिस्टर फिलिप्स ही पहिली कादंबरी इ. स. २००१ मध्ये बाजारात आली, तेव्हा तिच्या फक्त ४० हजार प्रती खपल्या; आणि प्रकाशनसंस्थेला मोठाच धक्का बसला. लिटल ब्राऊनने लेडिज् मॅन या कादंबरीसाठी अडीच लाख पौंडांचा ॲडव्हान्स दिला; पण तिच्या फक्त १५०० प्रती खपल्या. असे प्रकाशकांचेही अंदाज चुकतात, परंतु जागतिक पातळीवर बेस्टसेलर ठरू शकणाऱ्या लेखकांचा शोध प्रकाशक घेतच असतात; आणि असा बेस्ट सेलर हाताशी लागला तर त्याला सहजी सोडायला तयार नसतात.

भरवशाच्या म्हशीला टोणगे होतात तसेच काही वेळा काही पुस्तके अनपेक्षितपणे बेस्ट सेलरच्या यादीत जातात. हॅरी पॉटर या कुमार नायकाने पुस्तकाच्या खपाचे उच्चांक मोडले. त्याच्या पहिल्या पुस्तकाच्या प्रती पहिल्या वर्षात फक्त दहा हजारच खपल्या. पण पुढे खप वाढत गेला आणि चौथ्या पुस्तकाने तर साडेतीन लाख प्रतींची आगाऊ नोंदणी करून उच्चांक गाठला. पहिल्या दिवशीच ५ लाख २ हजार प्रतींची विक्री हा ग्रंथविक्रीक्षेत्रातला कळसच होता ! इंटरनेटवर या पुस्तकाची साडेतीन लाख प्रतींची ऑर्डर नोंदवली गेली हाही एक उच्चांकच ! त्यापूर्वीचा उच्चांक जॉन ग्रिशमच्या द ब्रेदर्नचा ४३ हजार प्रतींचा होता. हॅरी पॉटरच्या पुस्तकावर निघालेल्या चित्रपटाने पहिल्या दहा दिवसात १८ कोटी ८० लाख डॉलर्सचा (नऊशे कोटी रुपये) धंदा केला. मुलांची पुस्तके खपत नाहीत, मुले पुस्तके वाचत नाहीत हा समज हॅरी पॉटरने मोडीत काढला !

स्टिफन हॉकिंगचे 'ए ब्रीफ हिस्टरी ऑफ टाइम' हे खरे तर विज्ञानाचा इतिहास सांगणारे छोटेसे पुस्तक. पण त्याच्या लाखो प्रती विकल्या गेल्या. दोन वर्षे ते पुस्तक बेस्ट सेलरच्या यादीत होते. डेव्ह सोबेलच्या लाँजिट्युड या पुस्तकानेही दहा लाख प्रतींची मजल गाठली आहे. ई-बुक्सच्या स्वरूपातच उपलब्ध होणाऱ्या स्टिफन किंगच्या पुस्तकानेही तीन लाखावर ग्राहक मिळवले हेही सर्वांना ठाऊकच आहे.

विमानतळावरील बुक शॉप्समध्ये कोणत्या पुस्तकांना व लेखकांना जास्त मागणी असते, त्यावरूनही बेस्टसेलर्सचा अचूक अंदाज लागतो असे लक्षात आले आहे. जॉन ग्रिशम, जिली कपूर, स्टिफन किंग, पॉट्रिशिया कॉर्नवेल, विल्बर स्मिथ, डॅनिएल स्टील, यांची पुस्तके विमानतळावर जास्त जातात असे नुकत्याच केलेल्या पाहणीवरून दिसून येते. विमानतळावरील पुस्तकांच्या दुकानात होणाऱ्या विक्रीचा निम्मा भाग हा बेस्ट सेलर लेखकांचा असतो असेही आढळून आले आहे. बेस्ट सेलर्सच्या यादीत त्या शिवाय मायकेल क्रायटन, जेफ्री आर्चर, फ्रेडरिक फोरसिथ, रॉबिन कुक, आइन रँड, रिचर्ड बाख, केन फोलेट, डेव्हिड स्टील, जोन हॅरिस, वुइल्यम गोल्डिंग, ॲलिस्टर मॅक्लिन, मारिओ पुझो, लोर्ना सेज, आयर्विंग वॅलेस, हॅरॉल्ड रॉबिन्स, ॲगाथा ख्रिस्ती, पी डी जोन्स, जॉन ल कार वगैरे लेखकांचाही समावेश होता. बेस्ट सेलर्स पुस्तकांना नावे ठेवणारा

एक वर्ग आहे, परंतु ती पुस्तके लाखो वाचकांना खिळवून ठेवतात, वाचणे भाग पाडतात, जीवनाची वेगवेगळी रूपे दाखवतात हे खरेच आहे. बहुतेक चांगले लेखक हे आपापल्या काळात बेस्ट सेलर असतात. चार्लस डिकन्स, सर आर्थर कॉनन डाइल, ट्रोलोप, खलिल जिब्रान, ग्रॅहॅम ग्रीन, सॉमरसेट मॉम, ज्यूल व्हर्न, एनिड ब्लायटन, पी जी वुडहाऊस हे आपल्या हयातीत लोकप्रिय होते आणि अजूनही त्यांची वाचकांवरची पकड कमी झालेली नाही. पाठ्यपुस्तकात त्यांचा समावेश झालेला आहे, दूरचित्रवाणीवर त्यांच्या मालिका आल्या आहेत, चित्रपट निघाले आहेत आणि तरीही त्यांचा खप कमी झालेला नाही.

केवळ कादंबऱ्या व थरार कथाच बेस्ट सेलर्स ठरतात असे नाही हे स्टिफन हॉकिंगच्या 'ए ब्रीफ हिस्टरी' ने दाखवून दिले आहे. विमानतळावरच्या पुस्तक विक्रीत ललितेतर साहित्यालाही चांगला प्रतिसाद मिळतो. ताज्या पाहणीत जॉर्जियाना, डचेस ऑफ डेव्हनशायर, स्टॅलिनग्राड या पुस्तकांनाही चांगली मागणी असल्याचे आकडेवारीवरून दिसते. दि इंग्लिश या जेरेमी पॅक्समनच्या चरित्रात्मक पुस्तकानेही विक्रीत आघाडी मिळवली आहे. कादंबऱ्यांखालोखाल चरित्रांना व आत्मचरित्रांना वाचकांच्या पसंतीत अग्रस्थान मिळते.

डेलिया स्मिथ या लेखिकेला वर्षाला एक कोटी पौंड रॉयल्टी मिळते. तिची बेस्टसेलर पुस्तके कुठली आहेत ? तर ती पाकशास्त्रावरची ! तिकडच्या त्या कमलाबाई ओगलेच म्हणा ना !

बेस्ट सेलर्सच्या लेखकांना आणि प्रकाशकांना आणखीही मोठी कमाई होते ती चित्रपटांमुळे ! एकेका चित्रपटांतून होणारी प्राप्ती ही पुस्तकांच्या खपातून मिळणाऱ्या रॉयल्टीपेक्षाही जास्त असते. सध्या चित्रपट निर्मितीला अवाढव्य खर्च होतो. आपल्या 'देवदास'ला पन्नास कोटी रुपये खर्च आला. पण ती कादंबरी पुस्तकरूपाने छापायला वीस-बावीस हजार रुपये खर्च फार तर येतो. त्यामुळे हॉलीवुडमधले चित्रपटनिर्मातेही सध्या नवी एखादी गोष्ट घेऊन तिच्यावर चित्रपट काढायचा धोका पत्करण्याचे टाळतात. बेस्ट सेलर ठरलेल्या पुस्तकावर चित्रपट काढणे अधिक सुरक्षित व फायद्याचे ठरते. बेस्ट सेलर लेखकाला दहा लाख डॉलर्स देणे त्या निर्मात्यांना अवघड वाटत नाही; कारण वाचक-ग्राहकांच्या पसंतीची त्यांना खात्री पटलेली असते. बेस्ट सेलर कादंबऱ्यांचे एजंटस त्यामुळे चित्रपट हक्कांसाठीही भरपूर मानधन मागतात व ते मिळवतातही ! अमेरिकेत सध्या बेस्ट सेलर्सवर भव्य चित्रपट काढण्यावर जास्त भर आहे. आणि त्यांना नेत्रदीपक यशही मिळत आहे. कॅप्टन कोरेलीज, मँडोलियन, चॉकोलेट, अँजेलाज् ॲशेस, फिव्हर पिच, शार्लोट ग्रे, बर्डसाँग, लॉजिट्यूड वगैरे कादंबऱ्यांवरील चित्रपटांची नावे वानगीदाखल देता येतील. मात्र कादंबरीवरून चित्रपट होण्याला काही वेळा बराच कालावधी लागतो. त्यामुळे एजंटस निर्मात्याशी विशिष्ट मुदतीचा करार करण्याबाबत दक्ष असतात. वर्ष-दीड वर्षासाठी करार करून पाच दहा हजार पौंड विसार घ्यायचा, तो करार पुढे वाढवत जायचा अशी एकूण पद्धत आहे. अनेकदा असे होते की तीन वर्षांनी निर्मात्यांचा उत्साह थंडावतो. आधीचा विसार एजंटाच्या खिशात जातो.

आपल्याकडे अजून जागतिकीकरणाचे हे सारे वारे यायचे आहे. परंतु आपल्या लेखकांनी केवळ मराठीपुरताच विचार न करता जागतिक वाचकाचे भान ठेवायला हवे.

**संपादक**



## साहित्यवार्ता

### जागतिक मराठी अकादमीच्या कार्याध्यक्षपदी रामदास फुटाणे

जागतिक मराठी अकादमीच्या कार्याध्यक्षपदी प्रसिद्ध कवी रामदास फुटाणे यांची निवड झाली आहे.

अकादमीच्या अध्यक्षपदी वैज्ञानिक डॉ.रघुनाथ माशेलकर आहेत; तर उपाध्यक्ष म्हणून उद्योजक शिवाजीराव अढळराव-पाटील, केसरी पाटील, लेखक डॉ.सुभाष भेंडे, रा.मो.हेजीब आणि अर्थतज्ज्ञ नरेंद्र जाधव काम करतील. ज्येष्ठ पत्रकार माधव गडकरी, राधाकृष्ण नार्वेकर, शशी भालेकर, रामकृष्ण नायक आणि मोहन पटवर्धन मार्गदर्शन करणार आहेत.

जागतिक मराठी अकादमीच्या कार्याला व्यापक स्वरूप देण्यासाठी कार्यकारिणीतील सदस्यांची विविध भौगोलिक भागातून निवड करण्यात आली आहे. सदस्यांची नावे पुढीलप्रमाणे - डॉ.निर्मलकुमार फडकुले (सोलापूर), यशवंतराव गडाख (नगर), गिरीश गांधी (नागपूर), भास्कर चंदनशिव (बीड), उदय लाड (मुंबई), चंद्रकुमार नलगे (कोल्हापूर), भास्कर चंदावरकर (पुणे), डॉ.अजय वैद्य (पणजी), सिसिलिया कार्व्हालो (वसई) आणि सी.बी.नाईक (कणकवली), तसेच जागतिक मराठी अकादमीच्या जबलपूर, इंदूर, दिल्ली इत्यादी शाखांचे कार्याध्यक्ष या कार्यकारिणीवर त्या-त्या भागाचे प्रतिनिधित्व करतील.

परदेशांतील विशेष प्रतिनिधी म्हणून नरेश मंत्री (जपान), अमान मोमीन, राजन गडकरी (अमेरिका), सुभाष दामले (एल.ए.), मीना प्रभू (ब्रिटन), किरण प्रधान (ऑस्ट्रेलिया) हे काम पाहतील.

### 'सीमान्तपूजन'चे प्रकाशन

''महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सोडविण्यासाठी विशाल गोमंतक राज्याची निर्मिती करणे, हाच सर्वांत योग्य तोडगा आहे. हा तोडगा सर्वांनी मान्य केला, तर सीमाप्रश्न भिजत पडणार नाही,'' असे प्रतिपादन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी केले.

शिवसेनेतर्फे बेळगावात झालेल्या सीमा आंदोलनाचे कार्यकर्ते वसईचे रवींद्र धुरी यांनी लिहिलेल्या 'सीमान्त पूजन' या पुस्तकाचे प्रकाशन शिवसेनाप्रमुखांच्या हस्ते आणि ज्येष्ठ साहित्यिक य.दि.फडके यांच्या उपस्थितीत 'मातोश्री' येथे २२ ऑगस्टला झाले. श्री. ठाकरे म्हणाले, ''सीमाभाग केंद्रशासित करण्याचा मार्गही मी सुचविला होता. हा प्रश्न आता अधिकच बिकट झाला आहे. सीमाभागातील नेत्यांचे आपापसातील मतभेदही त्याला बऱ्याच प्रमाणात कारणीभूत आहेत'' सीमाप्रश्न न्यायालयात नेऊन कायदेशीर मार्गाने तो सोडविण्याचा प्रयत्न करणे सीमावासीयांच्या दृष्टीने हिताचे ठरेल, असे मत डॉ. फडके यांनी व्यक्त केले

## साहित्य संस्कृती मंडळाचे संदर्भ ग्रंथालय

''मराठी संतसाहित्याचे परदेशी भाषेत रूपांतर करून या साहित्याला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रयत्न करणार आहे,'' अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे यांनी दिली.

मंडळातर्फे पुण्यात संदर्भ ग्रंथालय आणि वाचनालय सुरू होत आहे. त्याचे उद्घाटन करताना ते बोलत होते. भरत नाट्य मंदिराच्या शेजारी असलेल्या वाङ्मय प्रकल्प विभागात हे ग्रंथालय आणि वाचनालय आहे. याच कार्यक्रमात मंडळाने प्रसिद्ध केलेल्या आणि प्रा.बा.ह.कल्याणकर यांनी संपादित केलेल्या 'पंडित जवाहरलाल नेहरू : व्यक्ती आणि कार्य': तसेच कै. डॉ.वा.न.कुबेर यांनी लिहिलेल्या 'भारताचा स्वातंत्र्यलढा : १९३० ते ३४' या दोन पुस्तकांचे प्रकाशन 'लोकसत्ता' चे संपादक अरुण टिकेकर यांच्या हस्ते या वेळी झाले.

ना. मोरे म्हणाले, ''पर्यावरण आणि दारिद्र्य या विषयांना आज मोठे महत्त्व आले असले, तरी शेकडो वर्षांपूर्वी संत तुकाराम आणि ज्ञानेश्वरांनी हे विषय हाताळले आहेत. विश्वात्मक भावनेचा विचार आणि चिंतन त्याच काळात झाले होते. दुर्दैवाने या थोरांचे साहित्य फक्त मराठीपुरतेच मर्यादित राहिले. ते देशातील इतर भाषांत आणि परदेशी भाषांत प्रसिद्ध झाले असते. तर त्याला आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाला असता. या साहित्याला हा सन्मान मिळवून देण्यासाठी राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रयत्नशील राहील.''

मंडळाचे अध्यक्ष प्रा. रा. रं. बोराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष रतनलाल सोनग्रा यांनी आभार मानले.

## संत तुकारामांच्या अभंगातील वैश्विक आवाहन : प्रा. मोरे

''संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांमधून माणसाच्या अस्तित्वाची उकल केली आहे. माणसाच्या भावभावनांची अभिव्यक्ती त्यांनी अभंगांतून केली आहे. त्यामुळे त्यांचे आवाहन वैश्विक आहे,'' असे पुणे विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ.सदानंद मोरे यांनी सांगितले.

विश्रांती पब्लिशर्स व 'सांजवार्ता' च्या वतीने 'अभंगसागर' या ग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ.मोरे बोलत होते. संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचा श्रीराम बापू शिकारखाने यांनी केलेला हा हिंदी अनुवाद आहे. पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी प्रमुख डॉ.आनंदप्रकाश दीक्षित, आमदार दिगंबर भेगडे व देहूच्या श्री.विठ्ठल-रखुमाई देवस्थानचे अध्यक्ष प्रल्हाद इनामदार प्रमुख पाहुणे होते. हा अनुवाद म्हणजे मराठी व हिंदी या दोन भाषांमधील एक सेतू आहे, असे सांगून डॉ.दीक्षित म्हणाले, ''कवितेचा अनुवाद आत्मलीन होऊन करावा लागतो. संत काव्य रचतात ते कवी म्हणून रचत नाहीत, विशिष्ट भावाने व विशेष ध्यासाने रचना करतात. त्यामुळे संतकाव्याचा अनुवाद अधिक कठीण असतो. आध्यात्मिक साधनेने व आतून आनंदाने भरून पावल्यानेच हे काम शक्य होते.

## स्त्री अभ्यास केंद्रे आवश्यक

''सर्व प्रकारच्या शोषणाच्या विरोधात उभी राहणारी सामाजिक बांधिलकी ही समाजातील सकारात्मक बदलासाठी आहे. तिचा अधिक सकसपणे, डोळसपणे आणि वस्तुनिष्ठपणे अभ्यास होण्याची गरज आहे. त्यासाठी स्त्री अभ्यास केंद्राची आवश्यकता आहे,'' असे मत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. या केंद्राच्या पदविका अभ्यासक्रमाचे उद्घाटन राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.राजेंद्र व्होरा यांच्या हस्ते झाले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा.पुष्पा भावे आणि केंद्राच्या प्रमुख विद्युत भागवत या वेळी उपस्थित होत्या.

''स्त्री अभ्यास हा ज्ञानाचे नव्या पद्धतीने व्यवस्थापन करतो. आपले राजकीय पक्ष पितृसत्ताक पद्धतीने काम करतात,'' असे प्रा.पुष्पा भावे यांनी सांगितले.

## डॉ. आंबेडकरांची मराठीतील भाषणे

राज्य सरकारच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचा अठरावा खंड प्रसिद्धीच्या मार्गावर आहे.

आतापर्यंतचे सतरा खंड इंग्रजीत होते. अठराव्या खंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मराठीतील भाषणांचा समावेश करण्यात आलेला आहे. अठराव्या खंडाचे तीन भाग करण्यात आलेले असून, प्रत्येक भाग सुमारे सहाशे पृष्ठांचा आहे.

या संदर्भात माहिती देताना डॉ. गंगाधर पानतावणे म्हणाले, ''डॉ. आंबेडकर यांचे समग्र साहित्य एकूण २१ खंडांत प्रसिद्ध करण्यात येत आहे. १७ खंड प्रसिद्ध झालेले आहेत. अठरावा खंड मराठीत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२० ते १९५६ या काळात केलेल्या ३५१ भाषणांचा समावेश या अठराव्या खंडात करण्यात आलेला आहे. प्रा. अशोक गोडघाटे, डॉ. एम. एल. कासारे आणि श्री. एन. जी. कांबळे हे या खंडाचे संपादक आहेत

विषयसूची, व्यक्तिसूची, स्थलसूची आणि जातींची सूची, अशा चार प्रकारच्या सूची या खंडात असतील.

मराठी भाषणांचा हा खंड प्रसिद्ध झाल्यानंतर डॉ. आंबेडकर यांच्याबद्दलचे अनेक गैरसमज दूर होतील. प्रारंभीच्या काळातील भाषणांमध्ये त्यांनी गांधीजींचा अत्यंत आदरपूर्वक उल्लेख केलेला आहे. त्यांना महात्माजी म्हणून संबोधलेले आहे. १९२७ मध्ये अमरावतीला केलेल्या भाषणात 'महात्मा गांधी' असा उल्लेख आढळतो. नंतरच्या काळात त्यांनी आपल्या अनेक भाषणांमध्ये ब्रिटिशांवर टीकेचे आसूड ओढलेले आहेत. ब्रिटिशांच्या राजकीय व आर्थिक नीतीचा खरपूस समाचार घेतलेला आहे. इंग्रजांच्या हातून सत्ता काढून घेतली पाहिजे, असेही म्हटलेले आहे. अस्पृश्य समाजातील महार, मांग, ढोर, चांभार आणि भंगी या सर्व जातींच्या लोकांनी संघटित होऊन, एकत्र येऊन, आपले प्रश्न सोडविले पाहिजेत, असे म्हटलेले आहे. डॉ. आंबेडकर हे कधीही स्वराज्याच्या विरुद्ध नव्हते, किंबहुना स्वराज्य कसे असले पाहिजे याची चर्चा केलेली असून देशाच्या एकात्मतेवर सतत आपल्या भाषणांमधून भर दिलेला आहे. कार्यकर्ता आणि नेता कसा असावा ते सांगताना बेकार व स्वाभिमानशून्य नेत्यांपासून सावध राहण्याचा इशाराही देऊन ठेवलेला आहे. शेतीवरही काही भाषणे आहेत. त्यांची सगळी भाषणे धारदार आहेत. त्यात कठोरपणा आणि परखडपणा आहे; पण असे असले तरी त्यांनी कुठेही भाषेचा तोल जाऊ दिलेला नाही. ते गोष्टी

सांगत सांगत लोकांशी संवाद साधतात. 'ब्राम्हणबाधा', 'गांधीवेड' असे फक्त त्यांचेच म्हणता येतील, असे काही शब्द या भाषणांमध्ये आलेले आहेत. त्यांना मराठी हिंदी-इंग्रजीबरोबरच उर्दू, पर्शियन, गुजराथी, फ्रेंच, अशा इतरही अनेक भाषा अवगत होत्या. हेही त्यांच्या या भाषणांमधून स्पष्ट होते.''

## 'प्रा. लि. नवनीतम' पुस्तकाची 'लिम्का बुक' मध्ये नोंद

खासगी कंपन्यांना लागू होणाऱ्या कंपनी कायद्यातील कलम व नियमांची माहिती असलेल्या 'प्रा.लि. नवनीतम' या पद्यमय पुस्तकाची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये झाली आहे.

एम. जे. रिसबूड आणि कंपनीचे सचिव महेश रिसबूड यांनी अठरा अध्यायांत काव्यरूपाने लिहिलेले हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. या पुस्तकात कंपनी कायदा व नियम, याविषयी माहिती देण्यात आली आहे. श्री. रिसबूड यांचे 'खासगी कंपन्यांसाठी कंपनी कायदा' हे पुस्तक यापूर्वी प्रकाशित झाले आहे.

## व. दि. : सर्जनशील समीक्षक

''सर्जनशीलतेची जोपासना करण्याची समीक्षकाची सांस्कृतिक जबाबदारी डॉ. व.दि.कुलकर्णी यांनी योग्य रीतीने पार पाडली. यासाठी त्यांची सात्विकता व संस्कृती-समाजनिरपेक्ष रसिकता उपयुक्त ठरली,'' असे ज्येष्ठ समीक्षक व मराठी विश्वकोशाचे संपादक रा.ग.जाधव यांनी सांगितले.

डॉ.व.दि.कुलकर्णी यांच्या 'निवांत निवृत्ती' व 'स्थान पोथी' या पुस्तकांचे प्रकाशन करताना ते बोलत होते.

डॉ. कुलकर्णी यांचे व्यक्तिमत्त्व जीवनाचा स्वीकार, स्वागत व सर्जन करणारे होते, असे सांगून जाधव म्हणाले, ''त्यांच्या ठायी तल्लख संवेदनशीलता, विलक्षण रसिकत्व व परंपरेतील आनंदी वृत्ती होती. ज्ञानेश्वरांपासून बोरकरांपर्यंत एकाच वेळी जिवंत कुतूहलाने पाहणाऱ्या कुलकर्णी यांनी वाचक म्हणून आपली वाचनक्षमता संपन्न करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानार्जन व ज्ञानबोध या त्यांच्या मुख्य प्रेरणा होत्या. त्यांच्याबरोबर मराठी अध्ययन-अध्यापनाचे एक पर्व संपले.''

डॉ. कुलकर्णी यांच्यामध्ये कधी विचाराचे एकारलेपण नव्हते. तसेच, ते आपली भूमिका सौम्यपणे, पण ठाम शब्दांत व्यक्त करत होते, याकडे डॉ.गं.ना.जोगळेकर यांनी लक्ष वेधले. ते जीवनावर व साहित्यावर निष्ठा असलेले शिक्षकांचे शिक्षक व समीक्षकांचे समीक्षक होते असे डॉ. वि. भा. देशपांडे म्हणाले, शुभदा शेळके यांनी आभार मानले.

## 'दहशतवादविरोधातील लढ्यात लोकांचा सहभाग'

''दहशतवादाच्या विरोधातील लढा प्रदीर्घ काळ चालणारा असून, वेदना सहन करण्याची सर्वसामान्यांची शक्तीच त्यात निर्णायक ठरणारी आहे,'' असे मत लेफ्टनंट जनरल (निवृत्त) अशोक जोशी यांनी व्यक्त केले.

लेफ्टनंट जनरल (निवृत्त) एरिक वाझ यांनी लिहिलेल्या 'एबीसी ऑफ पीस अँड सिक्युरिटी' या पुस्तकाच्या प्रकाशनानिमित्त आयोजिलेल्या परिसंवादात ते बोलत होते. लेफ्टनंट जनरल (निवृत्त) वाय. डी. सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. 'वन इयर ऑफ वॉर ऑन टेररिझम - व्हेअर आर वुई टुडे' या विषयावरील परिसंवादात लेफ्टनंट जनरल वाझ, लेफ्टनंट जनरल जोशी, मेजर जनरल (निवृत्त) के. एस. पेंडसे, कर्नल (निवृत्त) अनिल आठल्ये आदींनी भाग घेतला.

दहशतवाद हा सत्ता व सामर्थ्य यांचे प्रदर्शन करण्याचे साधन बनल्याचे नमूद करून लेफ्टनंट जनरल जोशी म्हणाले, ''जागतिकीकरणामुळे दहशतवादाचा प्रश्न जटिल झाला आहे. त्याच्या विरोधातील लढा हा प्रदीर्घ चालणारा आहे. 'राष्ट्रराज्ये' बळकट बनली आणि छुप्या युद्धापासून त्यांना रोखले, तर दहशतवाद कमी होऊ शकेल.''

## साहित्य-संस्कृती मंडळाच्या योजनांसाठी जादा तरतूद

साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या पुस्तक प्रकाशन, प्रकाशनार्थ अनुदान तसेच यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार या योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जादा खर्चास मंजुरी दिली आहे. साहित्य-संस्कृती मंडळाच्या काही योजनांसाठीचे मानधन कमी असल्यामुळे पुस्तक तपासणी, अनुवाद, प्रकाशनासाठीचे अनुदान या करिता काम करण्यास लोक नाराज असत. ही बाब लक्षात घेऊन मानधनात वाढ करण्यात आली असून जादा खर्चापोटी २ लाख ४७ हजार रुपये उपलब्ध झाले आहेत.

प्रकाशन वा अनुवादासाठी आलेली हस्तलिखिते तपासून त्यावर अभिप्राय देणाऱ्या तज्ज्ञांचे एका हस्तलिखिताचे मानधन आता ५०० रुपये करण्यात आले आहे. मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यात येणाऱ्या मराठी भाषेतील लेखनास दर हजार शब्दांमागे दिले जाणारे १०० रु. मानधन वाढवून ३०० रु. करण्यात आले आहे. अभारतीय भाषांमधून मराठीत अनुवाद करण्यासाठी दर हजार शब्दांमागे ६०रु. मानधन होते ते २०० रु. करण्यात आले आहे.

ललितेतर वाङ्मयातील पुस्तक प्रकाशन अनुदान योजनेसाठी स्वत: लेखकाकडून हस्तलिखित आले असल्यास त्याच्या निर्मिती खर्चाच्या ५० टक्के परंतु कमाल १४ हजार रुपये दिले जात. ही रक्कम २० हजार रुपये करण्यात आली आहे. प्रकाशक संस्थेकडून आलेल्या हस्तलिखिताच्या निर्मितीसही ७५ टक्के परंतु जास्तीत जास्त २० हजार रुपये दिले जातील.

नवलेखक अनुदान योजनेतील हस्तलिखिते तपासून अभिप्राय देणाऱ्या तज्ज्ञांच्या मानधनातही वाढ करण्यात आली असून काव्य, नाटक, एकांकिका या साहित्य प्रकाराच्या एका हस्तलिखितास ३०० रुपये तर कथा, कादंबरी, ललित, वैचारिक या साहित्य प्रकारातील एका हस्तलिखितास ४०० रुपये दिले जाणार आहेत.

या अनुदान योजनेअंतर्गत प्रकाशित झालेल्या पुस्तकांना देण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण पुरस्काराच्या रकमांमध्येही वाढ करण्यात आली आहे. ही रक्कम आता दोन हजार रूपये होईल. नवलेखकांची पुस्तके प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकांना प्रोत्साहन देण्यासाठी, या वर्षापासून सर्वोत्कृष्ट साहित्य निर्मिती करणाऱ्या एका प्रकाशकास दोन हजार रुपयांचा पुरस्कार देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

## जयकर ग्रंथालयातील पुस्तकांची देवघेव 'स्मार्ट कार्ड' द्वारे होणार

पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयातील पुस्तकांची देवघेव 'स्मार्ट कार्ड' द्वारे होणार आहे. ग्रंथालयात सव्वाचार लाख पुस्तके आहेत.

रेडिओ लहरींच्या (रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन-आरएफआयडी) तंत्रज्ञानाद्वारे हे आधुनिकीकरण केले जात असून, त्यासाठी जर्मनीच्या 'एक्स-आयडेन्ट'या कंपनीबरोबर विद्यापीठाने करार केला आहे. डॉ. अशोक कोळस्कर म्हणाले, ''प्रत्येक पुस्तकावर 'इलेक्ट्रॉनिक चीप' बसविली जाणार आहे. पुस्तकाबद्दलची माहिती त्यात असेल. पुस्तके घेणाऱ्या प्रत्येकाला 'स्मार्ट कार्ड' दिले जाणार आहे. याखेरीज या इलेक्ट्रॉनिक साधनांवरील माहिती वाचण्यासाठी 'रीडर' असणार आहे. या तीन बाबींद्वारे ग्रंथांच्या देवघेवीची सर्वंकष माहिती उपलब्ध होईल.''

जयकर ग्रंथालयात सुमारे सव्वाचार लाख पुस्तके आहेत. त्या सर्वांसाठीच्या 'चीप' जर्मन कंपनीकडून घेतल्या जात आहेत. मात्र , माहितीसाठीची संगणकप्रणाली पुणे विद्यापीठातच विकसित करण्यात आली आहे. हा प्रकल्प सुमारे दीड कोटी रुपयांचा आहे. हे तंत्रज्ञान अन्य ग्रंथालयांना देण्यासाठी आणि त्याद्वारे महसूल मिळविण्यासाठी 'एक्स-आयडेंट' बरोबर करार झाल्याचे कुलगुरूंनी सांगितले.

सध्या सुमारे अडीच हजार पुस्तकांवर 'चीप' बसविण्यात आली असल्याची माहिती ग्रंथपाल एस.के.पाटील यांनी दिली. वर्षभरात हे काम पूर्ण झाल्यानंतर ग्रंथालयाच्या सर्व सदस्यांना 'स्मार्ट कार्ड' देण्यांत येईल. पुस्तकावरील चीप आणि स्मार्ट कार्ड यांवरील माहिती 'रीडर' मार्फत वाचली जाईल आणि पुस्तक परत करण्यासाठी 'ड्रॉप बॉक्स' ची सोय करण्यात येणार आहे. त्यामुळे पुस्तके घेण्यासाठी माणसाची गरज भासणार नाही.''

या तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयाचे व्यवस्थापन करणे सुलभ होईल. एखादी अनधिकृत व्यक्ती पुस्तक घेऊन ग्रंथालयाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर जात असेल, तर तशी सूचना देणारी घंटी वाजवण्याची व्यवस्थाही या तंत्रज्ञानात आहे.

विकासप्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाइी संशोधन प्रकल्प राबविणाऱ्या 'मीडिया लॅब-एशिया' बरोबर पुणे विद्यापीठ काही प्रकल्पांत सहभागी होणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. 'मीडिया लॅब' चे काही प्रकल्प निश्चित करून निर्णय घेतला जाईल.

## चित्रपट समीक्षकांवर 'इम्पा'चे निर्बंध

नवीन चित्रपटांच्या प्रदर्शनानंतर संबंधित चित्रपटांच्या पहिल्या आठवड्यातील उत्पन्नाची टक्केवारी आणि व्यवसायावर विपरीत परिणाम होणारे परीक्षण वृत्तपत्रांतील समीक्षक व दूरचित्रवाणी वाहिन्यांनी लगेच प्रसिद्ध करू नयेत, असा निर्बंध 'इम्पा' ने (इंडियन मोशन पिक्चर प्रोड्युसर्स असोसिएशन) घातला आहे.

अपयशी चित्रपटांचे प्रमाण वाढल्याने हिंदी चित्रपटसृष्टीला सावरण्यासाठी 'इम्पा' ने 'युनायटेड फोरम ऑफ एन्टरटेनमेंट इंडस्ट्री'ची स्थापना केली व मनोरंजन उद्योगासाठी एक नियमावली जाहीर केली. 'इम्पा' च्या अध्यक्षा स्मिता ठाकरे, तसेच 'असोसिएशन ऑफ मोशन पिक्चर अँड टीव्ही प्रोग्राम प्रोड्यूसर्स' चे अध्यक्ष पहलाज निहलानी आणि 'वेस्टर्न इंडिया फिल्म प्रोड्युसर्स असोसिशन' चे अध्यक्ष संग्राम शिर्के यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली होती.

नवीन चित्रपट प्रदर्शित झल्यानंतर दुसऱ्याच आठवड्यात वृत्तपत्रांमधून , तसेच विविध वाहिन्यांवर संबंधित चित्रपटांच्या व्यवसायाचे आकडे प्रसिद्ध केले जातात. त्यामुळे 'इम्पा' ने संबंधित आकडे प्रसिद्ध न करण्याचे बंधन घातले आहे. उल्लंघन झाल्यास संबंधित वृत्तपत्रांशी तसेच



दूरचित्रवाहिन्यांशी असहकार पुकारण्यात येईल.

मनोरंजन उद्योगासाठी तयार करण्यात आलेल्या नियमावलीतील काही महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे (या नियमांची अंमलबजावणी १५ सप्टेंबरपासून करण्यात येत आहे.) :

१) कोणत्याही निर्मात्याने आपल्या चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी संबंधित चित्रपटातील संपूर्ण गीताची चित्रफीत संगीत कंपन्यांकडे सोपवू नये.

२) मान्यवर कलावंतांच्या वेशभूषेसाठी स्टुडिओमध्ये 'मेकअप व्हॅन' पुरविल्या जातात. या खर्चिक 'व्हॅन' पुरविण्याऐवजी स्टुडिओतील 'मेकअप रुम्स' अधिक सुसज्ज कराव्यात.

३) निर्मात्यांनी कलावंतांना मानधनाखेरीज इतर कसलीही रक्कम देऊ नये.

४) नृत्यदिग्दर्शकाने आपल्या नर्तकांना ठरलेल्या मानधनाखेरीज इतर मार्गांनी रक्कम मिळवून देण्यासाठी निर्मात्यांवर दबाब आणू नये.

५) निर्माता संघाने ठरविलेली रक्कम कलावंतांच्या वेशभूषाकारांना मानधनापेटी देण्यात यावी.

६) चित्रपटांच्या विदेशी चित्रीकरण सत्रामध्ये कलावंतांच्या नातेवाइकांना शक्यतो प्रवेश देण्यात येऊ नये. एखाद्या कलावंताने आग्रह धरल्यास आपल्या कुटुंबीयांचा खर्च त्याने स्वत: करावा.

७) चित्रपटांच्या 'प्रिंटस्' तयार करणाऱ्या प्रयोगशाळांनी दरकपात करावी.

८) निर्मात्यांनी 'सॅटेलाईट' तसेच 'व्हिडिओ'साठी चित्रपटांचे हक्क विकताना अधिक काळजी घ्यावी.

## माध्यमांनी देशाचा सांस्कृतिक वारसा जपावा : कादर खान

चित्रपट, दूरदर्शन, रंगभूमी या माध्यमांतून प्रसारित होणाऱ्या कलाकृतीमध्ये अलीकडे परकीय संस्कृतीचे अंधानुकरण वाढत आहे. आपल्या देशाचा सांस्कृतिक वारसा मोठा आहे. माध्यमांनी तो जपणे आवश्यक आहे, असे मत चित्रपट अभिनेते कादर खान यांनी व्यक्त केले.

उर्दू नाटककार सईद अहमद यांच्या 'सारे जहाँ से अच्छा' या उर्दू नाटकाच्या पुस्तकाचे प्रकाशन कादर खान यांनी केले. याप्रसंगी महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पी.ए.इनामदार, हाजी गुलाम मोहम्मद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मुनव्वर पीरभाय, अय्युब इलाही बक्ष, अभिनेते श्रीकांत मोघे उपस्थित होते. गझाला शेख यांनी सूत्रसंचालन केले, तसेच आदील अत्तार यांनी आभार मानले.

## स्त्री अभ्यासाचा पाया व्यापक करण्याचा प्रयत्न

स्त्रीअभ्यास किंवा जेंडर स्टडीज ही अलीकडे उदयाला आलेली ज्ञानशाखा आहे. सध्या स्पर्धा परीक्षा सरकारी धोरणे, साहित्याचा अभ्यास असो किंवा सामाजिक शास्त्रे या क्षेत्रात, स्त्रियांचा समावेश आणि त्यांचा विचार करावाच लागतो. अर्थात स्त्रियांचे प्रश्न आणि स्त्रियांचे एकूण समाजरचनेतील स्थान यांचा शिस्तबद्ध अभ्यास, 'स्त्री-अभ्यास' या ज्ञानशाखेत १९७५ पासून केला जात आहे. स्त्रियांविषयीचा अभ्यास हुंडाबळी किंवा दु:खभऱ्या कहाण्या यांच्यापुरताच मर्यादित नाही. स्त्रियांच्या एकूण राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे आकलन म्हणजे स्त्रीअभ्यास होय. या ज्ञानशाखेत जात, वर्ग, वंश आणि लिंग यांच्या परस्परसंबंधांची चिकित्सा आणि शोषण व्यवस्थेतील हातमिळवणी स्पष्ट केली जाते. भूतकाळात आणि वर्तमानकाळात प्रमुख

प्रवाहातून बाहेर फेकले गेलेल्यांच्या अनुभवांचे आणि विचारांचे फेरसंशोधन केले जाते.स्त्री अभ्यासात सिद्धान्त आणि प्रत्यक्ष कृती, ज्ञान आणि अनुभव, व्यक्तिनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ या द्वैताच्या मर्यादा ओलांडण्याचा प्रयत्न केला जातो. ज्ञान म्हणजे काय, याचीच नव्याने व्याख्या केली जाते. या ज्ञानशाखेचा विस्तार चळवळ आणि प्रत्यक्ष कृती यातून झालेला असल्याने ज्ञान, अनुभव आणि समाजपरिवर्तन यांमधला परस्परसंबंध ठळकपणे मांडला जातो.

अशा स्वरूपाचा विचार आणि अभ्यास करणारे स्त्रीअभ्यास केंद्र पुणे विद्यापीठात १९८७ पासून कार्यरत आहे. पहिल्यापासून केंद्राने आपले लक्ष पश्चिम भारतावर केंद्रित केले आहे. अध्यापन, संशोधन आणि इतर कार्यक्रम यांचा उत्कृष्ट मेळ घालणाऱ्या भारतातील काही निवडक केंद्रांपैकी हे एक केंद्र आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्रीअभ्यास केंद्रातर्फे संशोधन, अध्यापन, परिषदा, कार्यशाळा, माहिती संकलन व प्रसारण, विस्तार व संपर्क असे विविध कार्यक्रम राबवले जातात. केंद्रातर्फे चालविला जाणारा स्त्रीअभ्यासातील आंतरशाखीय पदव्युत्तर प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा भारतातील या प्रकारचा पहिलावहिलाच अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमात स्त्रीवाद तसेच स्त्रीअभ्यास म्हणजे काय, त्यातील सिद्धान्त, वैचारिक लेखक यांचा ऊहापोह केला जातो. तसेच विकासनीती, विकास, जागतिकीकरण आणि या सगळ्यांचा स्त्रियांवर होणारा परिणाम व त्यांचे गुंतागुंतीचे नाते यासंबंधीच्या सैद्धांतिक लिखाणावर भर दिला जातो. या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचा जात, वर्ग व लिंगभाव यांच्या संदर्भातील आकलनाद्वारे प्रादेशिक पातळीवर लिंगभेदाचा अभ्यास कसा करावा, याचे प्रशिक्षण दिले जाते.

या अभ्यासक्रमात सहभागी होणारे विद्यार्थी वर्षभर एका विषयावर सातत्याने तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली काम करून एक शोधनिबंध सादर करतात. तसेच ते प्रत्येक विषयावर एक अभ्यासपूर्ण निबंध किंवा पुस्तक परीक्षण करतात. विषयाच्या निवडीचे स्वातंत्र्य असल्यामुळे स्त्रिया आणि क्रीडाक्षेत्र, स्त्रियांवरच्या लिखाणाची चिकित्सा, चित्रपट, नाटक यांचे परीक्षण, एखाद्या समूहाचे, रुढीचे सामाजिक इतिहासाच्या दृष्टिकोनातून आकलन अशा विविध विषयांवर काम करतात.

याचा पुढचा टप्पा म्हणून पदविका अभ्यासक्रम या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे आणि स्त्रीअभ्यासाचे आंतरशाखीय स्वरूप अधिक सखोल व व्यापक करण्यासाठी विद्यापीठपातळीवर अवलंबिण्यात आलेली श्रेयांक पद्धतीही स्त्रीअभ्यास केंद्रांनी स्वीकारली आहे. पदविका अभ्यासक्रमात जे स्त्रीप्रश्नावर काम करीत आहेत किंवा ज्यांनी अभ्यासातील एखादा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, त्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

अभ्यासक्रमाच्या आखणीत स्त्रीवादी सिद्धांकन, प्रमाणशास्त्रीय आणि संशोधन पद्धतीवरचे सिद्धांकन आणि स्त्रीवाद्यांनी भारतीय संदर्भात विविध क्षेत्रात केलेले सखोल संशोधन यावर भर आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे दोन विषय निवडता येतील. या ऐच्छिक विषयांमध्ये सामाजिक, इतिहास, राष्ट्र व समूह आणि स्त्रिया, स्त्रिया आणि लैंगिकता, मानसिक आरोग्य इत्यादी विषयांचा समावेश आहे.

## पंचतंत्र - हितोपदेशाचा इंडोनेशियन अनुवाद

पशुपक्ष्यांच्या रंजक कथांमधून जीवनाचे सार सांगणाऱ्या पंडित विष्णू शर्मालिखित 'पंचतंत्रा'च्या



कथा आता इंडोनेशियन भाषेतही (बहासा इंडोनेशिया) पोहोचल्या आहेत.

पंचतंत्र हा सध्या अस्तित्वात असलेल्या सर्वात प्राचीन भारतीय कथांचा संग्रह आहे. इ.स. पूर्व २०० च्या काळात पंडित विष्णू शर्मा यांनी लिहिला. एका राजाच्या तीन मुलांना व्यावहारिक शहाणपण शिकविण्याची जबाबदारी विष्णु शर्मांवर टाकली होती. त्याने पाच विभागांद्वारे विविध कथांच्या माध्यमातून त्या मुलांना हे धडे दिले. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, राजकारण, मानवी नातेसंबंध अशा विविध अंगांचा वेध घेणारा हा ग्रंथ ५० हून अधिक भाषांमध्ये अनुवादित झाला आहे. इंडोनेशियन अनुवादाचे श्रेय जी.एल.चंदीरामाणी यांजकडे जाते.

१९४३ साली लाहोरहून मुंबईत स्थलांतरित झालेल्या चंदीरामाणी यांनी औद्योगिक रसायनांच्या व्यवसायात आपले बस्तान मांडले. पण ते रमले मात्र भारतीय प्राचीन संस्कृतीतील संगीत, भाषा यांचा वारसा जपण्याच्या कामात. युरोपियन लँग्वेजेस इन्स्टिट्यूटचे संचालक व जर्मन-इंग्रजी-संस्कृत भाषांचे पंडित प्रा. स. बा. हुदलीकर यांच्याशी काही वर्षांपूर्वी त्यांची ओळख झाली.त्यातूनच अनुवादातून भाषा शिकण्याचे वेध चंदीरामाणींना लागले आणि सुमारे ३० वर्षांपूर्वी त्यांनी प्रा. हुदलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पंचतंत्राचा इंग्रजी व जर्मन भाषेत अनुवाद केला.

जर्मन व संस्कृत यातील व्याकरणसाधर्म्यामुळे या दोन भाषात सुरुवातीपासून आदानप्रदान होत होते. पंचतंत्राच्या इंग्रजी अनुवादाची सध्या १४ वी आवृत्ती बाजारात आहे.

इंडोनेशियात १२ वर्षे वास्तव्यास असलेल्या ज्योती दर्यानानी यांनी पंचतंत्राचे इंडोनेशियन भाषेत भाषांतर केले आहे. इंडोनेशिया आणि भारत यांच्यात संस्कृतीचा एक दुवा आहे. तेथील जावा या मुख्य बेटावर कित्येक वर्षांपूर्वी कावी नावाची एक भाषा बोलली जायची. उत्तरेतील चोला व संस्कृत भाषेचे मिश्रण असलेल्या या भाषेत बालीतील एका राजाने भारतातील पंडितांच्या मदतीने पंचतंत्राचा अनुवाद करविला होता, असे ऐकायला मिळते. त्याचा पुरावा उपलब्ध नाही. शिवाय ही भाषाच आज अस्तंगत झाली आहे. परंतु तेथील बाली बेटावर पंचतंत्राप्रमाणेच तांत्री टेल्स प्रसिद्ध आहेत.

इंडोनेशियन दूतावासाने चंदीरामाणींच्या प्रकल्पांची खास दखल घेतली आहे. तेथील तरुण उपउच्चायुक्त हिदायत हे या कामात स्वारस्य घेत आहेत. हितोपदेशाचा इंडोनेशियन भाषेत अनुवाद करण्याचा प्रकल्पही त्यांनी हाती घेतला आहे.

## अमेरिकेत मराठी विद्यापीठ स्थापन व्हावे

'मराठी विद्यापीठ' ही आकर्षक संज्ञा अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांनी सुचवली असून मुख्यत: अमेरिकेत राहणाऱ्या मराठी पालकांच्या मुलांनी मराठी शिकून त्यासाठी परीक्षा घ्याव्यात व त्याप्रमाणे त्यांना प्रमाणपत्र, पदविका द्याव्या; त्यांना मान्यता मिळाल्यास विद्यार्थ्यांना श्रेयगुण लाभून बृहन्महाराष्ट्रात व परदेशातही मराठी भाषा जागती राहील अशी कल्पना त्या मागे आहे.

मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रभाकर देवधर यांनी मराठी विद्यापीठाची कल्पना मांडली तेव्हा तिचे जोरदार स्वागत झाले. हा उपक्रम फक्त मराठी भाषेच्या अभ्यासापुरता मर्यादित राहून चालणार नाही; सबंध मराठी जीवनाला कवटाळणारा असवा. असे सुचवले गेले . सध्या मराठी समाजात आपली भाषा व संस्कृती ह्या विषयी चिंता आहेच. या  दृष्टीने विद्यापीठाचे स्वरूप व्यापक

असावे. मराठी विद्यापीठ हा एक ट्रस्ट असावा. उद्योगपती-उद्योजक, व्यावसायिक व कार्यकर्ते विश्वस्त सदस्य असावे. ट्रस्ट सरकार व दैनंदिन राजकारणनिरपेक्ष असावा. त्याचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र असे असावे. माध्यमे ग्रामसभेपासून आंतरजालकापर्यंत सर्व असावीत. ट्रस्ट स्वावलंबी असावा. ना नफा ना तोटा तत्वावर चालावा. त्यामुळे प्रारंभी कर्ज उभारूनदेखील हा ट्रस्ट उभा करण्यास हरकत नाही.

विद्यापीठाचे काम 'नेटवर्क' धर्तीने चालावे. हाती घ्यायची कामे वेगवेगळ्या संस्था व व्यक्ती यांच्यामार्फत व्हावी. ह्या संस्था मराठी विद्यापीठाशी संलग्न असाव्या. विद्यापीठाने त्यांच्यावर कामे सोपवावी. त्यासाठी निधीची तरतूद करावी. उदा. विज्ञानप्रसाराचे जाळे विज्ञान परिषदेने टाकावे, तर मराठीपणाचा शोध प्रस्थापित विद्यापीठांच्या माध्यमातून घेतला जावा. संचिताचे अधोरेखन 'ग्रंथाली' ने करावे.

हेतू - मराठी समाज एकसंध व्हावा, त्यात आधुनिकता यावी, तो उत्कर्षाप्रत जावा. मराठी समाजातील उपक्रमशीलता जागी व्हावी. मराठी माणसास मराठी असल्याचा अभिमान वाटावा असे वातावरण निर्माण करावे. विद्यापीठाच्या कार्यक्रमात नकारात्मकता नसावी; हेतू साधण्याच्या दिशेने केलेले एल्गार असे त्याचे स्वरूप असावे.

कार्यक्रम - विद्यापीठाने प्रारंभी पुढील कामे हाती घ्यावीत.

१)मराठीपणाचा शोध - 'मराठी' कोणास व कशास म्हणावे? मराठीपण म्हणजे काय ? महाराष्ट्राची घडण चार वेगवेगळे प्रदेश एकत्र येऊन झाली आहे. सतत स्थलांतरामुळे व बाहेरून लोंढे आल्याने ही विभिन्नता अधिकच वाढली आहे व सखोल झाली आहे. त्यातच, जातीजातींच्या गलबल्याने महाराष्ट्राचे एकसंध रूप स्पष्ट होत नाही व त्यामुळे कोणतीही मोहीम हाती घेताना विभागीय विचार करावा लागतो. व कार्यास बाधा येते.

'एक्झिट पोल' च्या धर्तीवर महाराष्ट्रात सहा महिने पाहणी करून, एका छोट्या प्रश्नपत्रिकेच्या आधारे मराठीपणाची वैशिष्टये नक्की करता येतील. त्यांत शास्त्रीयता असेल व त्यांना जनाधार लाभलेला असेल.

२) मराठी भाषेच्या परीक्षा - महाराष्ट्राच्या भूमीपासून दूर असलेल्या जनांना मराठीकडे आकर्षित करण्यासाठी मुख्यत: या परीक्षा आंतरजालकामार्फत आयोजित करायच्या आहेत.

प्रमाणपत्र व पदविका अशा या दोन परीक्षा असतील. वेगवेगळ्या वयोगटांसाठी त्यांचे स्वरूप वेगवेगळे असेल. म्हणजे, शाळा-महाविद्यालयांतील मुलांना त्यामध्ये श्रेयगुणांचे आकर्षण असेल, तर प्रौढांना आपले 'मुळे' शोधता येतील, अशा तऱ्हेच्या अभ्यासाचे स्वरूप असेल.

३) दुकानांच्या पाट्या मराठीत असाव्या, रेल्वेचे नामफलक दुरुस्त करावे, दूरदर्शन - वृत्तपत्रे यांतील मराठीची दुरवस्था दूर करावी अशी आंदोलने हाती घेणे - मराठीच्या शुद्धाशुद्धतेची काळजी करणे - भाषा व संस्कृती या दोन्ही अंगांनी. उदाहरणार्थ, ठाण्याचे अरुण फडके ह्यांचा 'लेखनकोश' मराठी लेखनासाठी प्रमाण म्हणून वापरावा असा 'आदेश' विचारपूर्वक कोणत्या संस्थेने द्यायचा? तर विद्यापीठाने !

४) वैचारिक आदान-प्रदान - खुली वैचारिक देवाणघेवाण ही कोणत्याही निरोगी व विकसनशील समाजाची गरज असते. आज महाराष्ट्रात ती मंदावली आहे. या प्रकारच्या जुन्या संस्था ही साचली तळी झाली आहेत. नोकरशहा, वैज्ञानिक, समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, तसेच आजचे



व्यावसायिक हेदेखील विचारवंत असू शकतात हा विश्वास ठेवून आदानप्रदान घडावे.

५) संचिताचे अधोरेखन - महाराष्ट्राच्या संस्कृती संचिताच्या खुणा रेखून भाववृत्ती व संवेदना जाग्या ठेवणे. हे काम बरेच होत आहे. त्यास दिशा देणे, शिस्त आणणे.

६) विज्ञानप्रसार - महाराष्ट्रात विज्ञानवृत्ती वाढती राहावी, कामामध्ये विज्ञान-तंत्रज्ञानाचा बाज व कसोशी यावी यासाठी व्यापक जाळे टाकणे.

७) प्रकाशाची बेटे - विधायक, व्रतस्थ कार्य हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य. महात्मा गांधी यालाच कार्यकर्त्यांचे मोहोळ म्हणाले होते. आजच्या महाराष्ट्रात असे हजारभर तरी लोक, संस्था आहेत. त्यांना जाणून घेऊन त्यांच्या कार्याचा परिणाम तपासणे. किंबहुना गेल्या पंचवीस वर्षांत मराठी जीवनाचे (संस्कृतीचे) नेतृत्व साहित्यिक-कलाकारांकडून अशा सामाजिक कार्य करणाऱ्यांकडे गेले आहे. ही प्रक्रिया समजावून घेणे.

८) कर्तबगारीची नोंद - जगात अनेक ठिकाणी व वेगवेगळ्या क्षेत्रात मराठी माणसाने कर्तबगारी गाजवल्याची उदाहरणे ऐकतो. त्यांची नोंद करणे. (Directory of achievers & achievements).

९) गावांचे सर्वेक्षण - गेल्या दोनपाचशे वर्षांत महाराष्ट्रातील गावे, वस्त्या विकसित होत गेल्या. तेथील स्थानिक माणसांकडून या गावांची विकासकहाणी सामाजिक अंगाने लिहिणे .

संपर्क: ग्रंथाली, द्वारा, टोपीवाला लेन म्युनिसिपल स्कूल, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ.भडकमकर मार्ग पोलिस स्टेशन समोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७ दूरध्वनी : ३८७५४८१

## विद्यापीठीय अभ्यासक्रमातही आता मूल्यशिक्षणाचा समावेश

विद्यार्थ्यांत मानवताधर्म आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागावी यासाठी शालेय शिक्षणापाठोपाठ आता उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमातही मूल्यशिक्षणाचा समावेश करण्यासाठी राज्यातील कुलगुरूंचा गट स्थापन करण्यात आला आहे. पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. सदानंद मोरे हे या गटाचे निमंत्रक असतील.

उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी कुलगुरूंची बैठक पुणे येथे घेतली होती. विद्यार्थ्यांमध्ये माणुसकी विकसित व्हावी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागावी यासाठी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून काही तरी तातडीने करणे आवश्यक असल्याने नेमकी पावले उचलण्यासाठी कुलगुरूंचा गट स्थापन करण्याचे त्यांनी जाहीर केले.

योग्य नागरिक घडविण्यात सध्याची शिक्षणप्रणाली अयशस्वी ठरत असल्याचे स्पष्ट करून बाळासाहेब भारदे म्हणाले, ''शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होणे अपेक्षित आहे. मानवधर्म हाच सर्वश्रेष्ठ धर्म असल्याचे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे गरजेचे आहे. आपला देश, संस्कृती, इतिहास याबद्दल त्यांना अधिक आस्थेने माहिती द्यायला हवी. उच्च शिक्षण हे विविध शाखांमध्ये कप्पेबंद झाल्याने अशा प्रकारचे शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना मिळत नाही.''

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर, मुंबई विद्यापीठोच कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले, डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. सोनवणे, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ए. एस. सातपुतळे, अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. एन. पाटील, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.

रूपा शहा; तसेच ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. राम ताकवले, संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनचे संचालक विवेक सावंत, उच्च शिक्षण सचिव चंद्रा अय्यंगार, संचालक डॉ. एस. एन. पठाण या बैठकीस उपस्थित होते.

''राष्ट्रीय सेवा योजना, 'कमवा आणि शिका' आदी योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी भावना वाढीस लागली जाते. मात्र, या योजनांत सहभागी होणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी आहे. त्यामुळे मूल्यशिक्षणाचा सहभाग करण्याची गरज आहे.'' असे मत बहुतेक कुलगुरूंनी व्यक्त केले

## मतिमंद मुलांवरील उपचारासाठी 'आर्ट थेरपी' चा वापर

मतिमंद मुलांवरील उपचारांत आता एक नवी पद्धती प्रकाशझोतात येण्याची शक्यता आहे. ही पद्धती आहे कलेच्या वाटेने या मुलांमधील क्षमता उमलवू पाहणारी 'आर्ट थेरपी'...

मतिमंद मुलांना प्रथम अक्षर आणि क्रमांक ओळख करून देण्यापेक्षा रंग, रेषा आणि आकारांच्या मार्गाने त्यांच्यातील क्षमता फुलवू पाहाण्याचा प्रयोग या मुलांसाठीच्या विविध शाळांमध्ये सुरू आहे, असे दिल्लीतील अमरज्योती शाळेतील शिक्षिका पूर्णिमा मुखर्जी यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या, आमच्या शाळेत आम्ही मुलांना चित्रकला आणि हस्तकला याचे शिक्षण देतो. त्यानाही त्यात गोडी वाटते. प्रथम आम्ही मुलांना हातावरच रंग घ्यायला सांगतो. त्यानंतर त्याचे ठसे उमटवायला सांगतो. त्यामुळे मुलांना रंगांचे वेडच लागते आणि त्यांच्या मनात कलेबाबतची गोडी रुजते, असे मुखर्जी म्हणाल्या.

जर्मन आर्टथेरपीस्ट इग्मर्ड कॉफ या सध्या दिल्लीत आहेत. त्या म्हणाल्या, आर्ट थेरपीचा उगम अठराव्या शतकात झाला आहे. दुभंगलेल्या व्यक्तिमत्वाच्या काही रुग्णांना मानसोपचारतज्ज्ञांनी चित्रे काढायला सांगितले. त्यांच्या आधारे त्यांनी मानसोपचाराची दिशाही ठरविली. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र या थेरपीकडे दुर्लक्ष झाले.

## 'डिजिटल लायब्ररी' प्रकल्पात दहा लाख ग्रंथ : डॉ. कोळस्कर

''आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहज उपलब्धतेमुळे ज्ञानार्जनाच्या रूढ संकल्पना बदलणार आहेत. म्हणूनच ग्रंथ इंटरनेटवर उपलब्ध करून देण्यात पुणे विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. 'डिजिटल लायब्ररी' प्रकल्पात दहा लाख ग्रंथ उपलब्ध होणार आहेत,'' असे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी सांगितले.

'डिजिटल लायब्ररी' हा प्रकल्प जगातील काही ग्रंथालयांमध्ये राबवला जात आहे. तिरुपती येथेही असा प्रकल्प आहे. हा प्रकल्प सुरू करण्यात विद्यापीठांमध्ये पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाला पहिला मान मिळाला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन उच्च शिक्षणमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते झाले.

या प्रकल्पांतर्गत दुर्मिळ व स्वामित्व हक्काचा कायदा लागू नसलेली पुस्तक सुरवातीला इंटरनेटवर उपलब्ध होतील. या कामासाठी सध्या दोन डिजिटल कॅमेरे व स्कॅनर विद्यापीठाकडे असून, आणखी सहा स्कॅनर घेतले जाणार आहेत. 'कमवा व शिका' या योजनेखालील विद्यार्थी स्कॅनिंगचे काम करतील, असा डॉ. कोळस्कर यांनी सांगितले.

डेक्कन कॉलेजमध्ये असलेले मोडी लिपीतील व अन्य भाषांमधील दुर्मिळ ग्रंथ या प्रकल्पात



जतन करता येतील. सरकार त्यासाठी सहकार्य करील. आपला ज्ञानाचा ठेवा जगात पोचवण्यासाठी विद्यापीठाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल त्यांनी आनंद व्यक्त करून, राज्यातील सर्व विद्यापीठांनी एकाच दिशेने पुढे जावे, असे श्री. वळसे-पाटील यांनी सुचविले.

ग्रंथपाल डॉ.एस.के.पाटील यांनी प्रास्ताविक केले. नीला देशपांडे यांनी आभार मानले. राजा दीक्षित यांनी सूत्रसंचालन केले.

## सातारा नगरवाचनालय : वय वर्षे १५०

सातारा, येथील नगर वाचनालयाच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षाचा प्रारंभ आणि त्याचे औचित्य साधून, अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचा सत्कार करण्यात आला. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आणि प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी शब्दफुलांची पखरण करीत या कार्यक्रमाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले.

आज आपण मुलांकडे लक्ष देत नाही; देश श्रीमंत होतो तो मुलांच्या जीवावर हे लक्षात घेत नाही, असे सांगून पुरंदरे यांनी ग्रंथालये म्हणजे मोठी शक्ती असून, त्या शक्तीचा उपयोग झाला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

जेव्हा काही पहावे, काळजाचा ठाव घ्यावा असे वाटते त्या वयात या नगर वाचनालयाने आपल्याला उत्तमोत्तम ग्रंथांचा परिचय करून दिला. अनेक पुस्तकांचा स्पर्श येथे झाला. त्यामुळे हे नगर वाचनालय म्हणजे आपले तीर्थस्थान आहे. दीडशे वर्षे वयाच्या नगर वाचनालयाचा मी ७५ वर्षांचा मुलगा आहे, असे प्रा. भोसले यांनी सांगताच सारे सभागृह मोहरून गेले.

## वृद्धाश्रम हा सांस्कृतिक अबलतेवरचा उतारा

सर्व धर्माचे-पंथाचे, भिन्न भाषांचे, भिन्न संस्कृतीचे लोक वृद्धाश्रमात एकत्रित येत आजहेत आणि भारताची वेगळी संस्कृती निर्माण होत आहे. भारत देश एकत्र ठेवायचा असेल तर अशी संस्कृती निर्माण होणे गरजेले आहे. याकरिता आनंदाश्रम हवेत. असे प्रतिपादन किर्लोस्करचे संपादक मुकुंदराव किर्लोस्कर यांनी काढले.

सातारा येथील आनंदाश्रमाच्या नूत वास्तूचा उद्घाटनसोहळा किर्लोस्कर यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध नटवर्य चंद्रकांत गोखले होते.

किर्लोस्कर म्हणाले, वृद्धापकाळ म्हणजे नाटकाचा दुसऱ्या अंकात प्रवेश होय. वृद्धाश्रमात कोणावर जाण्याची वेळ येऊ नये, याकरिता प्रत्येकाने एक चतु:सूत्री पाळावी- प्रत्येकाचे आर्थिक स्वावलंबन हवे, कोणावर हक्क गाजवू नये, कोणीही विचारल्याशिवाय सल्ला देऊ नये, मुलांना स्वातंत्र्य द्यावे पण एकटे राहण्याची सवय लावावी. वृद्धाश्रम या संस्थांनी स्वत:ची संघटना निर्माण करावी म्हणजे त्यांना आपापसांत देव-घेव करता येईल, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षपदावरून नटवर्य चंद्रकांत गोखले म्हणाले की, माझ्यासारख्या सामान्य नटाला, सातारकरांनी जी आपुलकीची वागणूक दिली, ती मला विसरता येणार नाही.

यावेळी चंद्रकांत गोखले यांच्या हस्ते, डॉ. सुभाष दांडेकर, डॉ. अशोक गोंधळेकर, डॉ. श्याम बडवे, नानासाहेब द्रविड, बाळासाहेब परांजपे यांचा सत्कार करण्यात आला.



# स्वत:ची कहाणी अपुरीच ठेवून अचानक गेलेले शिवाजी सावंत

डॉ. आनंद यादव

'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत यांचे निधन अचानक आणि अनपेक्षित झाले. तसे ते विपरीत नाट्यपूर्ण रीत्याही झाले. ते त्यांच्या राहत्या घरी न होता, गोव्यासारख्या दूरच्या प्रदेशात मडगाव येथे झाले. नियतीने त्यांचा प्रवास क्रूरपणे अर्ध्यावरच उधळला. वयाच्या अवघ्या ६२व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

७६व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक-प्रक्रिया सुरू झाली होती. प्रा. सुभाष भेंडे, प्रा. जवाहर मुथा आणि शिवाजी सावंत हे तिघेजण या निवडणुकीच्या रिंगणात होते. तिघांनीही आपल्या कमरा कसल्या होत्या. या निवडणुकीचे मतदार तसे नेहमीप्रमाणे महाराष्ट्राच्या चारही प्रदेशात विखुरलेले होते. त्यांचे बालेकिल्ले प्रामुख्याने नागपूर, औरंगाबाद, मुंबई, पुणे, गोवा आणि कराड या केंद्रात होते. सप्टेंबरच्या तेवीस तारखेपासून मतदान पत्रिका मतदारांकडे पाठविल्या जाणार होत्या. तत्पूर्वी या मतदारांना शक्यतो भेटून, स्वत:विषयी सविस्तर सांगून त्यांची मते स्वत:कडे खेचून घेण्याची उमेदवारांची स्वाभाविक इच्छा होती. त्यासाठी हे तिघेही उमेदवार दौरे करत होते. दिवस फारच थोडे होते. वातावरण योग्य वेळी, तडफेने तापविणे गरजेचे होते. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराने भरगच्च कार्यक्रम आणि उपक्रम हाती घेतले होते. त्यांची निवेदने, मुलाखती, बातम्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत होत्या. लोकांत जिज्ञासा निर्माण झाली होती. परस्परांच्या मतांवर, विचारांवर, त्यांच्या कार्यावर उलटसुलट क्रिया-प्रतिक्रिया येऊ लागल्या होतया. निवडणुकीविषयी उत्सुकता निर्माण झालेली. 'हा' येणार का 'तो' याविषयी चर्चा-वाद वाचकवर्गात झडत होते.

अशा ऐन गतिमान वातावरणात शिवाजी सावंत महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतील दौरे आटोपून गोव्याला गेलेले होते. १४ सप्टेंबरपासूनच ते कराड, सांगली, कोल्हापूर, आजरा, गोवा येथील मतप्रचार, सभा, भेटी, पत्रकार मुलाखती इत्यादीसाठी दौऱ्याची आखणी करून पुण्यातून बाहेर पडले होते. १७ तारखेला ते गोव्यात जाऊन पोचले होते. १८ तारखेला गोवाकार्यकम आटोपून ते १९ तारखेला पुण्यास परतणार होते.... पण नियतीने त्यांचा हा दौरा विपरीतपणे पुरा केला. सप्टेंबरच्या १८ तारखेलाच त्यांचे सकाळी १०च्या दरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने गोव्यात मडगाव येथे निधन झाले आणि १९ तारखेला पहाटे पाचच्या आसपास त्यांचे पार्थिव पुण्यात आणण्यात आले.

एका जिद्दीने ते ही निवडणूक लढवीत होते. गेली दोन वर्षे ते या संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी उत्सुक होते. अनेक प्रकारे चाचपणी करत होते. चर्चा करून, एकमेकांच्या सहकार्याने अनुकूलतेची प्रतीक्षा करीत होते. ती वेळ ७६व्या संमेलनाच्या वेळी आलेली आहे, असे वाटून त्यांनी उमेदवारीचा अर्ज भरला होता. अनेक प्रकारची अनुकूलता असूनही ही घटना अतिशय दुर्दैवी ठरली. त्यांच्या घरादारावर आकाशाची कठोर कुऱ्हाड तर कोसळलीच पण सर्वच मराठी रसिकांना तिने शोक सागरात बुडविले.

शिवाजीरावांचा जन्म १९४० साली कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या छोट्या खेड्यात झाला. एका सामान्य, कष्टाळू कुटुंबात ते जन्माला आले होते. परिस्थितीमुळे त्यांना कॉलेजचे शिक्षण पहिल्या वर्षीच सोडावे लागले होते. नंतर त्यांनी नोकरीच्या सोयीसाठी कॉमर्स डिप्लोमा पूर्ण करून टायपिंगच्या सामान्य शिक्षकाची नोकरी कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये पत्करली होती.

त्यांची नोकरी सामान्य शिक्षकाची असली तरी त्यांची प्रतिभा असामान्य आणि अलौकिक कोटीतील होती. नोकरी सांभाळता सांभाळता त्यांनी वाचनाचे वेड आणि लेखनाचा छंद आवडीने जोपासला होता. या काळात वि. स. खांडेकर यांची 'ययाती', रणजित देसाई यांची 'स्वामी' यासारख्या पौराणिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्या प्रचंड गाजत होत्या. खांडेकर-देसाई साहित्यिक मंडळी कोल्हापूरची होती. त्या दोघांनाही या कादंबऱ्यांमुळे भारतीय पातळीवरचे पुरस्कार प्राप्त झाले होते. शिवाजीरावांचा कोल्हापूरातील हा काळ ऐन विशी-पंचविशीतला होता. कोल्हापूर शहराच्या वातावरणात ऐतिहासिकतेची मोठी परंपरा जिवंतपणे वावरत असते. त्यामुळे त्या शहरात वावरणाऱ्या कोणत्याही संवेदनशील, संस्कारक्षम तरुण मनावर इतिहास-पुराणातील उत्कट भव्यतेची, ऐतिहासिक-पौराणिक आर्दशांची संस्कार-मुद्रा उमटत असते. शिवाजीरांवाची मानसिकताही त्याला अपवाद नव्हती. या वातावरणाचा सखोल परिणाम त्यांच्याही मनावर होत होता. त्यातूनच त्यांनी ऐन उमेदीच्या पंचविसाव्या वर्षी महारथी कर्णाच्या जीवनावर 'मृत्युंजय' ही पौराणिक कादंबरी शैलीदार पद्धतीने लिहिली. ती १९६७ साली प्रसिद्ध झाली. शिवाजीरावांचे सर्व भवितव्य या कादंबरीने बदलून गेले. भावी जीवनालाही वेगळे वळण लागून त्यांची साहित्यिक वाटचाल एका विशिष्ट दिशेने सुरू झाली. 'लोकशिक्षण' मासिकाचे संपादक म्हणून ते पुण्यात आले. पुण्याचे सामाजिक-सांस्कृतिक वातावरण परंपरेनेच वाचन-अभ्यासासाठी आणि वाङ्मयनिर्मितीसाठी अनुकूल असल्यामुळे शिवाजीरावांचा वाङ्मयीन पिंड या वातावरणात चांगला पोसला गेला.

'मृत्युंजय' प्रसिद्ध झाल्यावर बारा वर्षांनी त्यांची 'छावा' ही कादंबरी (१९७९ साली) प्रसिद्ध झाली. त्यानंतर तब्बल एकवीस वर्षांनी (२००० साली) 'युगंधर' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. 'छावा' ही शिवपुत्र संभाजीच्या जीवनावरची ऐतिहासिक कादंबरी होती, तर 'युगंधर'ही श्रीकृष्णाच्या जीवनावरची महाभारतकालीन पौराणिक कादंबरी होती. १९६७ ते २००० या तीस-बत्तीस वर्षांच्या काळातील त्यांच्या या तीनही कादंबऱ्या महत्त्वाच्या असल्या तरी दरम्यानच्या काळात त्यांनी ललित लेख, व्यक्तिचित्रे, प्रसिद्ध व्यक्तींची दोन चरित्रे यासारखे स्फुट लेखनही केले. ते त्यांच्या 'अशी मने, असे नमुने', 'शेलका साज', 'कांचनकण', 'मोरावळा' 'लढत', 'संघर्ष' यासारख्या पुस्तकांत समाविष्ट झाले आहे.

शिवाजीरावांचे हे स्फुटलेखन आपल्या आसपासच्या परिसरात त्यांना जे विविध व्यक्तींचे अनुभव आले, ज्या व्यक्तींच्या घनिष्ट सहवासात, मैत्रीच्या वातावरणात ते रमले त्यातून स्फुरलेले आहे. ज्या अनेक मनात, माणसांत ते रमले, जे नाना प्रकारचे प्रसंग त्यांनी अनुभवले त्यांचा वैचारिक वा मूल्यात्मक वेध घेण्यापेक्षा त्यांच्या आस्वादातच ते रमले. ते अनुभवधन साजरेगोजिरे करून स्वीकारण्यात त्यांच्या वाङ्मयीन वृत्तिप्रवृत्ती विशेष रमलेल्या दिसतात. त्यामुळे त्यांचे स्फुट लेखन मनोरंजक वैशिष्ट्यांनी विशेष नटलेले दिसते. भाषिक शैलीच्या अनेक गुणांमुळे ही लेखने 'शेलक्या साजा'सारखी आकर्षक आणि 'कांचनकणां'सारखी झगमगणारी, मनापेक्षा डोळ्यांत विशेष भरणारी झाली. भावसौंदर्याने नटूनथटून ती वाचकाच्या मनात विराजमान होणारी झाली. या स्फुट लेखनासाठी त्यांनी खास कोल्हापूरी वळणाची डौलदार भाषा आणि सजग बोली वापरल्यामुळे



ही लेखने कोल्हापुरी वैशिष्ट्यांनी नटलेली, 'रसबाळी' झालेली आहेत.

शिवाजीरावांच्या तीनही कादंबऱ्या मात्र वेगळे पैलू आणि परिमाण घेऊन उभ्या आहेत. ह्या तीनही कादंबऱ्यांचे नायक इतिहासप्रसिद्ध किंवा पुराणप्रसिद्ध पुरुष आहेत. 'छावा' मधील शिवपुत्र संभाजी हा मराठी मनाचे सौभाग्यलेणे शोभावा असा आहे. प्रसिद्ध महाकाव्य-महाभारतातील कर्ण किंवा कृष्ण काय हे मुळातच शोकात्म स्वरूपाच्या या पौराणिक महाकाव्याचे नायक-उपनायक शोभावेत अशा योगयतेचे आहेत. हजारो वर्षांच्या भारतीय जनमानसात आणि पर्यायाने मराठी मनातही श्रद्धेचे, करुणेचे, आदराचे, भक्तीचे, आदर्शाचे दैवत म्हणून रुजलेले आहेत. आधीच प्रसिद्ध पुरुष म्हणून दैवते झालेल्या कर्ण, कृष्ण आणि संभाजीराजे यांना सावंतांनी आपल्या तिन्ही कादंबऱ्यात नायकाचे स्थान दिले आहे. त्यामुळे शिवाजी सावंतांच्या या तीनही कादंबऱ्या लोकमानसात अग्रस्थान पटकावून बसलेल्या आहेत. हे तीनही नायक भारतीय संस्कृतीतील उदात्त आणि शाश्वत जीवनमूल्ये स्वीकारून जगलेले, झगडलेले आहेत.

अशा या नायकांना शिवाजी सावंतांनी अभ्यासपूर्वक आत्मसात करून साहित्यनिर्मिती केलेली आहे. विपुल वाचन केल्याने या जीवनरेखा त्यांनी सलगपणे चरित्रात्मक पद्धतीने उभ्या केलेल्या आहेत. अगोदरच म्हटल्याप्रमाणे शिवाजी रावांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वात जी आस्वादक वृत्ती होती ती या नायकांना अधिक महान करण्यात यशस्वी झाली आहे. उत्कट, भव्योदात्त बघून तिथेच रमण्याचा शिवाजीरावांचा जो पिंड होता, त्याने या कादंबऱ्यांच्या लेखनात रम्यता, उत्कटता, भव्यता, सजगता आणली आहे. संवादनाट्य, कल्पकतेने उभे करण्याचे शिवाजीरावांचे भाषिक सामर्थ्य या कादंबऱ्यांतील पात्रांना जिवंत करते, वैशिष्ट्यपूर्ण करते. तपशील देण्याचा शिवाजीरावांचा वाङ्मयीन गुण या कादंबऱ्यांतील वातावरण, परिसर जिवंत आणि प्रत्ययकारक करणारा ठरला आहे. जणू या कादंबऱ्यांत शिवाजीरावांना त्यांच्या स्वत:मधील साहित्यिकच सापडल्याने इथे मणिकांचन योग जुळून आला आहे. शिवाजीरावांचे वाङ्मयीन मोठेपण यातच आहे. मराठी साहित्यात ते यामुळे अलौकिक ताकदीचे साहित्यिक म्हणून ओळखले जातील.


---

### *आमचं दैवत*

*आमचं 'दैवत' वेगळं होतं. आजही आहे. या पंढरीच्या विठोबापेक्षा वयानं लहान ! आमचं दैवत-राजा शिवाजी ! होय मार्क्सच्या साम्यवादाचा एक पाईक झालो- इथल्या भाषेत त्या दिंडीतला वारकरी झालो तरी दैवत होतं नि आहे राजा शिवाजी ! हेच दैवत का ? तर त्याचा झटक्यात मिळणारा वर माझ्या रांगड्या, शेतकरी, कुणबाऊ मनाला पटणारा होता. पेलणारा होता. कसला तो वर ? 'अन्यायाची चीड ! आणि त्याविरुद्ध लढा !' हेच जीवनभर करीत आलोय.*

*आयुष्याचा हिशेब कधी मांडला नाही. त्यामुळं ताळेबंद बघण्याची गरज उरली नाही. खूप बघितलंय. इतकं की बघून बघून नजर मरायला पाहिजे होती. मेली नाही. या देशाला थिजवणाऱ्या गुलामगिरीचा काळा दाट अंधार बघितला. कळायला लागलं तेव्हापासूनच त्या अंधारानं जीव घुसमटला. पेटून उठलो. अंगात हत्तीची रग होती, डोळ्यात सिंहाच्या नजरेची आग होती. रक्तात कृष्णा-कोयनेच्या पाण्याची जाग होती.*

***'मोरावळा' पुस्तकातून***



# अतृप्त 'अगस्ती'चे प्रस्थान

**डॉ. संगीता बापट**

१७ सप्टेंबरचा दिवस उजाडता उजाडता वसंत बापट नावाचे चैतन्याने सतत स्फुरण पावणारे एक विलोभनीय व्यक्तिमत्त्व मावळले. आठवडाभर मृत्यूशी चाललेली झुंज अखेर संपली. अखंड बोलण्याची हौस असलेले आणि माणसांचे लोभी असलेले हे कविमन आपल्या थकल्याभागल्या शरीरासह लौकिकदृष्ट्या मृत्यूच्या आधीन झाले.

ऐंशी वर्षांचे सुफळ संपूर्ण आयुष्य ते अगदी मनापासून जगले. आयुष्यात सुखदु:खाचे, आशानिराशेचे अनेक प्रसंग आले. ह्या साऱ्या बऱ्यावाईट प्रसंगांत त्यांना जगण्याचे प्रयोजन आणि बळ दिले त्यांच्या कवितेने ! ते आणि त्यांची कविता ह्या दोन स्वतंत्र गोष्टी नव्हत्याच ! कविता त्यांच्या रोमारोमांत भिनली होती. कविता म्हणजे त्यांचा श्वास होता. आणि तिने आपल्याला कधी सोडून जाऊ नये ही त्यांच अंतरीची आस होती.

१९५२ मध्ये 'बिजली' हा त्यांचा पहिला संग्रह प्रसिद्ध झाला आणि २५ जुलै २००२ रोजी 'शतकाच्या सुवर्णमुद्रा' हे त्यांचे अखेरचे पुस्तक प्रकाशित झाले होते.

साहित्यनिर्मितीच्या या दीर्घ प्रवासात त्यांनी साहित्याच्या अनेकानेक प्रांतांत मुक्त संचार केला. प्रतिभेची ही 'वॉशिंग्टनची कुऱ्हाड' वयाच्या सहाव्या वर्षीच त्यांच्या हाती आली होती. सुरुवातीच्या उत्साहात त्यांनी ती चौफेर चालवली. संस्कारक्षम वयात संपन्न संस्कृत वाङ्मयाची जाण त्यांच्या वडिलांनी त्यांना दिली. या वाङ्मयाने त्यांच्यावर अशी मोहिनी घातली की त्यांच्या प्रत्येक आविष्कारामध्ये तिचा प्रत्यय सुजाण वाचकांना येत राहिला. परीक्षेतले अनुवाद पद्यात करणे, अभ्यास नीट लक्षात राहावा म्हणून सूत्ररूपाने त्यांच्या कारिका तयार करणे, वर्गबंधू, शिक्षक यांच्यावर बऱ्यावाईट कविता करणे अशा भरपूर तयारीसह बापटांनी कवितेच्या प्रांतात पाऊल टाकले. आणि तो आला, त्याने पाहिले, त्याने जिंकले. जिंकण्याचा हा आत्मविश्वास त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पुरेपूर भरून राहिलेला होता.

४२ व्या चळवळीतला सहभाग, साने गुरुजी, रावसाहेब पटवर्धन, महात्मा गांधी, शिरूभाऊ एसेम अशा दिग्गजांचे मनावर झालेले संस्कार, देशप्रेमाने भारलेले मन या सर्वांनी त्यांचे आयुष्य समृद्ध केले. त्यांच्या कवितेत याचे सतत पडसाद उमटत राहिले. म्हणून सामाजिक जाणिवेची अभिव्यक्ती त्यांच्या काव्यातून झाली. आपला देश, त्याचा गौरवशाली इतिहास यांच्याबद्दलच्या प्रेमाने त्यांनी पोवाडे रचले. त्यांच्या सौंदर्यासक्त मनाचा आविष्कार त्यांच्या लावण्यांतून आणि भावकवितेतूनही झाला. खरे सांगायचे तर कोणताही विषय त्यांच्या कवितेने कधी वर्ज्य मानला नाही. म्हणून तर लावण्या, पोवाडे, प्रमाणेच अभंग, नाट्यमय कविता, बालकविता, बालनाट्य, मालिकाकविता असे कवितेचे अनेक प्रकार त्यांनी आपल्याला दिले. काव्यामध्ये समाजाच्या आशानिराशांना फार मोठे स्थान असले पाहिजे आणि तरीही कोणतीही विशिष्ट प्रणाली, पक्ष-पंथ-वाद यांनी कविता दूषित होता कामानये, हे भान या जातिवंत कवीला होते. कवीला शैली असू नये. प्रत्येक कवितेला तिचा जीव असतो, तिचे स्वतंत्र वळण असते, तिच्या आविष्काराची अंगभूत पद्धत असते. म्हणूनच कवीने कवितेच्या शैलीचे अनुकरण केले पाहिजे असे त्यांना वाटे. कविता ही



तिलोत्तमा आहे. कवी आपल्याला आलेल्या असंख्य अनुभवांतून तीळ तीळ जमवून काव्य निर्मिती करीत असतो, आणि हे रसायन जेव्हा जमते तेव्हाच उत्तम कविता जन्माला येते. आयुष्याचे अनेक रंग कवी अनुभवत असतो. त्या साऱ्या रंगांचा, त्यांच्या सूक्ष्म छटांचा आस्वाद कवीने अगदी मनापासून घेतला तर त्यांच्या कवितेतही ते सारे रंग, त्यांच्या साऱ्या छटा उतरल्यावाचून राहत नाहीत. सेतू, सकीना, अकरावी दिशा, मानसी, तेजसी, राजसी अशा अनेक संग्रहांतून बापटांच्या कवितेतले विविध रंग आपल्याला ठळकपणे दिसतात. बापटांची कविता आपल्या अनुभूतीशी अतिशय प्रामाणिक आहे. म्हणून या कवितेत प्रेमाच्या, प्रणयाच्या, त्यांच्या विभ्रमांच्या अनंत छटा जशा अभिव्यक्त झाल्या आहेत तशीच निसर्गातील स्पंदने, आदर्श पुरुषांची व्यक्तिचित्रे रेखाटणारी व्यक्तिपूजा, प्रखर सामाजिक जाणीव यांचेही दर्शन बापटांच्या कवितेने आपल्याला घडवले आहे. लय, छंद यांच्यावर त्यांचे प्रभुत्व असल्याने ही कविता छंदोबद्ध तर आहेच, पण मानसी, प्रवासाच्या कविता या संग्रहांत स्वैर शैलीतली भावनांचा आविष्कार कवीने केलेला आपल्याला दिसतो.

बापटांच्या प्रतिभेमध्ये अनेक साहित्यप्रकारांत संचार करण्याची क्षमता होती, पण एका जागी बैठक ठोकून लिहिणे त्यांच्या स्वभावात नव्हते. सर्व जग पाहू इच्छिणाऱ्या, सतत नवे नवे काही तरी करू पाहणाऱ्या लहान मुलाचे उत्साही मन त्यांना लाभले होते म्हणूनच साहित्यनिर्मिती इतकीच त्यांना उत्तम संगीतात रूची होती, अनेक खेळांमध्ये रस होता. भोवती घडणाऱ्या गोष्टींची चर्चा मित्रमंडळींत करायला त्यांना आवडत असे. उत्तमोत्तम गोष्टी खरेदी करायची हौस होती. किंबहुना, काय आणि किती करू, जीवनाच्या सर्व अंगांना कसा सामोरा जाऊ असा प्रश्न त्यांना सदैव पडे. आपल्या परीने त्याचे उत्तर शोधण्यासाठी मगक ते अखंड भटकत, वेगवेगळ्या माणसांना भेटत, उत्तमोत्तम मैफलींमध्ये रमत.

त्यांच्या कविताइतकाच त्यांच्या आयुष्याचा महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांच्यातला असामान्य शिक्षक. आयुष्यातली तीन तवे त्यांनी वेगवेगळ्या महाविद्यालयांमध्ये आणि नंतर विद्यापीठामध्ये संस्कृत, मराठी आणि तौलनिक साहित्याभ्यास या विषयांचे अध्यापन केले. त्यांचे शिकवणे केवळ शिक्षणक्रमापुरतेच मर्यादित नसे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये असलेली ध्येयनिष्ठा, त्यांची सौंदर्यासक्ती आणि विद्यार्थ्यांविषयीचा अतीव जिव्हाळा या गुणविशेषांचे संक्रमण विद्यार्थ्यांमध्ये करण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. जीवनामध्ये पाहण्याची विशाल दृष्टी त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना दिली.

आता हे सारे सारे संपले आहे. या उत्फुल्ल, चैतन्याने रसरसलेल्या आणि लहान मुलाचे उत्सुक मन लाभलेल्या या व्यक्तिमत्त्वाला आज पूर्णविराम मिळाला आहे. शरीराचे अस्तित्व काही काळ या नश्वर जगात राहते आणि नंतर एका नियत दिवशी त्याला या जगाचा कायमचा निरोप घ्यावा लागतो. रीतीप्रमाणे लोक काहीकाळ माणसाच्या जाण्याचा शोक करतात आणि पुन्हा काही काळाने आपल्या उद्योगाला लागतात. हा निसर्गाचा नियम आहे. पण काळाच्या या अखंड प्रवाहात काही भाग्यवान आपल्या नावाचे एक सुंदर बेट निर्माण करतात. माणूस नजरेच्या पलीकडे गेला तरी त्यांच्या कर्तृत्वाचे हे बेट असंख्यांच्या जीवनात विरंगुळा निर्माण करते. आज वसंत बापट नावाचा, काव्यशारदेच्या नभांगणातला एक तेजस्वी तारा अस्तंगत झाला आहे. नीलाकाशातल्या असंख्य ताऱ्यांपैकी ज्याचा होता त्याने नेला आहे. पण आपल्या असंख्य कवितांच्या रूपाने त्यांचे देदीप्यमान तेज अविरत आपल्यापर्यंत पोचत राहणार आहे. बापटांनी अगस्तीवर महाकाव्य लिहिण्याचा संकल्प केला होता, तो अधुराच ठेवून अगस्तीसारखेच ते पुन्हा एका नव्या प्रवासाला निघून गेले आहेत. पुन्हा परतून न येण्यासाठी !

# श्रद्धांजली

### स्वामी वरदानंद

डॉ. अनंतराव आठवले तथा स्वामी वरदानंद भारती यांच्या निधनाने दासगणू महाराजांच्या परंपरेतील ज्येष्ठ तत्त्वचिंतक हरपला आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील हजारो अनुयायी साधकांचे आयुष्य आपल्या अमोघ वाणीने बदलून टाकणाऱ्या आयुर्वेदविद्याशाखेतील पारंगत डॉ. आठवले यांनी वयाच्या सत्तराव्या वर्षी संन्यास घेतला. पुण्याच्या टिळक आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून निवृत्तीपर्यंत कार्यरत असलेल्या अनंतरावांनी आयुष्यभर कीर्तन, प्रवचन या मार्गांनी दासगणूमहाराजांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वरी हा त्यांच्या विशेष अभ्यासाचा विषय होता. प्रासादिक वाणी आणि त्याला असलेली भक्कम वैचारिक बैठक यामुळे त्यांची ज्ञानेश्वरीवरील प्रवचने साऱ्या महाराष्ट्रात आदरभावाने ऐकली जाते. दासगणू महाराजांच्या साहित्याचे दहा खंडात त्यांनी केलेले संपादन हाही त्यांच्या लेखनकार्यातील महत्त्वाचा भाग होता.

### प्रिया तेंडूलकर

'आपकी अदालत', 'प्रिया तेंडूलकर टॉक शो' या कार्यक्रमाद्वारे दूरचित्रवाणीच्या छोट्या पडद्यावर आपल्या करारी व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविणारी रसिकांची लाडकी 'रजनी' आणि मराठी साहित्यविश्वात कथांनी आपली स्वतंत्र मोहोर उमटवणारी बंडखोर लेखिका प्रिया तेंडूलकर यांचे १९ सप्टेंबर रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचे वय अवघे ४२ वर्षे होते.

प्रिया तेंडुलकर यांनी बँक कर्मचारी, पंचतारांकित हॉटेलातील स्वागतिका, मॉडेल, हवाई सुंदरी, अभिनेत्री, साहित्यिका, पत्रकार, चित्रवाणी मालिकांतील यशस्वी सूत्रसंचालिका अशा निरनिराळ्या भूमिका जीवनात यशस्वीपणे वठवल्या. त्या अत्यंत नाट्यपूर्ण, वादळी जीवन जगल्या.

गुजराती मराठी चित्रपटांतील काही भूमिकांबद्दल त्यांनी अभिनयाचे पुरस्कारही मिळवले.

तिच्या 'जन्मलेल्या प्रत्येकाला', जगले जशी, ज्याचा त्याचा प्रश्न, जावे तिच्या वंशा आदि पुस्तकांना पुरस्कारही मिळाले. बासू चतर्जींनी त्यांना 'रजनी' या दैनंदिन जीवनातील अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सामान्य गृहिणीची मालिका दूरदर्शसाठी करायला लावली आणि प्रिया घरोघरी सर्वांची लाडकी झाली.

### ज्येष्ठ गांधीवादी, साहित्यिक श्रीपाद जोशी यांचे निधन

जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक, महात्मा गांधी यांचे कट्टर अनुयायी, शब्दकोशकार आणि उर्दू भाषेचे अभ्यासक श्रीपाद रघुनाथ जोशी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते.

अर्धशतकाहून अधिक काळ साहित्यसेवा करताना जोशी यांनी विविध भाषांत सुमारे दोनशे पुस्तके लिहिली. मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कन्नड, आसामी, उडिया, फार्सी, अरबी आणि उर्दू या दहा भाषा त्यांना अवगत होत्या. त्यांचे साहित्यसंपदेत ७० पुस्तकांचे अनुवाद, दहा शब्दकोश आणि अठरा प्रवासवर्णनपर पुस्तकांचा समावेश आहे.

अर्धशतकांची साहित्यसेवा करताना रवींद्रनाथ टागोर, इकबाल, खलील जिब्रान आणि इस्लाम हे त्यांच्या अभ्यासाचे खास विषय राहिले






**स्वतःची पुनर्रचना करण्यासाठी लागणारे गुण तुमच्या अंतर्यामीच आहेत.**

# मनावर विजय

**एकनाथ ईश्वरन**

**अनु : वैशाली जोशी**

एकनाथ ईश्वरन हे इंग्रजीचे प्राध्यापक. १९६१-६२ मध्ये त्यांना फुलब्राइट शिष्यवृत्ती मिळाली. बर्कले विद्यापीठात त्यांना अध्यापनाचे काम मिळाले. टेनिस कोर्टवर खेळायला गेल्यावर त्यांना तेथील प्रशिक्षकाने काही गोष्टी सांगितल्या. उभं राहण्याची पद्धत, रॅकेट धरण्याची पद्धत, चेंडू हवेत उडवण्याची पद्धत, रॅकेटला स्विंग देण्याची पद्धत यातील चुका दाखवून म्हटले, ''नाउमेद होण्याची गरज नाही. स्वत:हून टेनिस शिकणारे लोक बहुधा याच प्रकारे सुरुवात करतात.'' आणि प्रत्येक गोष्ट कशी करायला हवी हे तो प्रशिक्षक समजावून सांगतो...त्यावर त्यांची प्रतिक्रिया ही सकारात्मक राहते याचे कारण ते जिला आपली आध्यात्मिक गुरू मानतात त्या त्यांच्या आजीने दिलेली शिकवण. त्यामुळे स्वत:कडे दुसऱ्यांच्या दृष्टीतून पाहता येणे.

आजीने सांगितलेली दुसरी गोष्टही ईश्वरनवर कायमची कोरली जाते. ''रमण माझ्याशी उद्धटपणे वागला. म्हणून मीही त्याच्याशी तसाच वागलो'' असे म्हटल्यावर आजी त्याला सांगते, ''या दोन गोष्टींचा एकमेकांशी काही संबंध नाही. तो तुझ्याशी उद्धटपणे वागला या गोष्टीचा तू काय म्हणतोस किंवा करतोस याच्याशी काय संबंध आहे?.. तू जिच्यावर नियंत्रण ठेवू शकशील अशी फक्त एकच व्यक्ती या जगात आहे आणि ती म्हणजे तू स्वत: . लोक तुझ्याशी कसे वागतात याचा विचार न करता तू लोकांच्या वागण्यावर आपली प्रतिक्रिया काय असावी याचा तू विचार कर. नाहीतर तुझी अवस्था रबराच्या चेंडूसारखी होईल. लोकांनी तुला भिंतीवर आपटायचं आणि तू टप्पा खाऊन परत यायचं.''

मनाला वळण लावून, मनावर ताबा मिळवूनच अडचणीतून मार्ग निघू शकतो. त्यासाठी आपल्या मनातील विचारांकडे अलिप्तपणे पाहता यायला हवे - ही शिकवण जन्मभर उपयुक्त व उपकारक ठरते.

एकनाथ ईश्वरन हे आपल्या प्रतिपादनाच्या स्पष्टीकरणासाठी जागोजाग दृष्टान्तकथा देतात; उदाहरणे देतात. त्यामुळे त्यांच्या विवेचनाच्या कक्षा रुंदावतात. आशयाची व्याप्ती वाढते. मनाचे

## पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

अमेरिकेत गेली ३० वर्षे ध्यानधारणेचे प्रशिक्षण देणाऱ्या एकनाथ ईश्वरन यांच्या गाजलेल्या पुस्तकाचा अनुवाद.

मनावर ताबा मिळवला तर आयुष्याला वेगळी दिशा लाभते. जीवन व चारित्र्य यांना वेगळा आकार लाभतो.

मनावर ताबा मिळवण्यासाठी ध्यान साधना उपयुक्त.

ध्यानसाधनेचा आठ कलमी कार्यक्रम.

मन स्थिर करा आणि आपण परमेश्वर असल्याचा अनुभव घ्या.

प्रशिक्षण हे खरे तर निरामय, सुखी, आनंदाचे निधान असते. आणि त्यासाठी अनेक कानमंत्र ईश्वरन देतात. काही कानमंत्र आपल्या रूढ विचारांनाच हादरा देतील. उदा. ''जे लोक अधिक साहसी आहेत त्यांना आपला स्वच्छंदीपणा कमी करण्यासाठी एक व्यायाम आहे. ज्या व्यक्ती तुम्हाला आवडतात अशा व्यक्तींच्या सहवासातच राहण्याची सवय सोडून द्या. अधूनमधून तुम्हाला न आवडणाऱ्या व्यक्तींबरोबर राहण्याचा परिपाठ ठेवा. त्यामुळे तुमच्या जाणिवेच्या कक्षा रूंदावून, तुमच्या जगाबाहेरच्या विश्वाशी तुमचा संपर्क राहील.''

एकनाथ ईश्वरन हे गेली तीस वर्षे अमेरिकन लोकांना ध्यानधारणेचे प्रशिक्षण देत आहेत; आणि त्या अनुभवाच्या आधारे त्यांनी आपल्या आयुष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी एका विशिष्ट अभ्यासप्रणालीची वा ध्यानधारणा तंत्राची निर्मिती केली आहे. ज्यांना खरोखरच ध्यानधारणा करायची इच्छा आहे, अशा लोकांसाठी त्यांनी कॉंक्वेस्ट ऑफ माइंड हे पुस्तक १९८८ साली लिहिले. ते अमेरिकेत खूप गाजले. त्यांना मोठा शिष्यवर्ग लाभला. त्या पुस्तकाचे मराठी भाषांतर मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रसिद्ध झाले आहे. वैशाली जोशी यांनी हे भाषांतर केले आहे.

ध्यानधारणेत मनावर नियंत्रण ठेवण्यावर भर दिला जातो; मनावर ताबा मिळवला तर आयुष्याला वेगळी दिशा मिळू शकते. आपले जीवन आणि चारित्र्य यांना नवा आकार देता येतो, नवे नातेसंबंध प्रस्थापित करता येतात आणि नव्या जोमाने जीवनाला सामोरे जाण्याची मानसिक तयारी होऊ शकते, असा एकनाथ ईश्वरन यांना विश्वास वाटतो. ''मन स्थिर करा आणि आपण स्वत: परमेश्वर असल्याची अनुभूती घ्या'' हे बायबलमधील वाक्य त्यांना प्रेरक व मार्गदर्शक वाटते.

मुक्तपणे विचार करणे (मनाचे प्रशिक्षण, कौशल्यप्राप्ती, अधिक खोल पाण्यात शिरणे (जीन म्हणजे योगसाधना), मुक्ततेसाठी व्यूहरचना, अंतरंगातील अवकाश अशा चार मुख्य विभागात वेगवेगळे विषय मांडून एकनाथ ईश्वरन यांनी शेवटी ध्यानसाधनेचा आठ कलमी कार्यक्रमही दिला आहे.



ध्यानसाधना रोज पहाटे अर्धा तास करावी, अधिक वेळ करायची असेल तर सायंकाळी किंवा रात्री झोपण्यापूर्वी आणखी अर्धा तास करावी. त्यापेक्षा जास्त करण्याची गरज नाही. ध्यानासाठी घरातलीच एखादी खोली वा जागा निवडा. त्या खोलीची ध्यानाशी मनोमन सांगड बसली की त्या खोलीत शिरल्याबरोबर आपले मन शांत होत असल्याचा अनुभव येऊ लागेल. ध्यानासाठी जमिनीवर किंवा सरळ पाठ असलेल्या खुर्चीवर बसा. डोकं, मान आणि पाठीचा कणा एका सरळ रेषेत येऊ द्या. एकाग्रता वाढू लागली की मज्जासंस्था शिथिल होऊ लागते. या अवस्थेत झोप येण्याची शक्यता असते. ती न यावी यासाठी स्वत:ला पाठीच्या आधारापासून दूर होऊन बसावे. **डोळे मिटून मनातल्या मनात एखादी प्रार्थना करावी; ती आपल्या अंतरंगातील देवाला, दैवी अंशाला आवाहन करणारी असावी.** प्रार्थनेवर पूर्ण लक्ष केंद्रित असावे. प्रार्थनेपासून मनाला भरकटू देऊ नका. प्रार्थना पुन:पुन्हा म्हणत राहा. प्रार्थनेसाठी निवडलेले उतारे सकारात्मक व व्यवहारी असावे.

**ध्यानाबाबतचे रहस्य म्हणजे आपण ज्या विषयाचे ध्यान करतो, तसेच होतो. ध्यानाने प्रार्थनेतील भाव हा आपला अंतरंगात भिनत जातो. आपल्या प्रत्येक उक्तीत आणि कृतीत त्याचा प्रभाव प्रकट होऊ लागतो.**

प्रार्थनेप्रमाणेच प्रत्येक धर्मात काही मंत्र वा पवित्र नावे असतात. त्यांचा मनातल्या मनात शांतपणे उच्चार करीत राहिले तर मनाची अवस्था बदलण्याची क्षमता निर्माण होते. रामनामाचा जप, अल्लाहो अकबर , रिबोनो शेल ओलाम (सगळ्या विश्वाचा देव), बरुख आट्टा अडोनाई (ज्यू - परमेश्वरा तू महान आहेस), ओम मणि पद्मेहम् (बौद्ध - हृदयकमळातील मौल्यवान रत्न) इ. काळजी वा निराशा वाटेल, मन क्षुब्ध होईल तेव्हा अशा मंत्राचा जप करा. त्यामुळे मन शांत होऊन तुमच्या विरुद्ध काम करणारी उर्जा तुमच्या भावनांना लगाम घालून योग्य दिशेला जाईल.त्याच प्रमाणे **तणाव कमी करणे, चित्त एकाग्र करणे, ज्ञानेंद्रियांना प्रशिक्षण देणे, इतरांच्या हिताला प्राधान्य देणे, संत महात्म्यांच्या साहित्याचे वाचन करणे, सत्संग ठेवणे यांचाही एकनाथ ईश्वरन यांच्या आठ कलमी कार्यक्रमात समावेश केला गेला आहे.**

आपल्याला या आठ कलमांमध्ये फार वेगळे असे काही आढळणार नाही; परंतु त्या सर्व गोष्टी गांभीर्याने करण्याला महत्त्व आहे; आणि त्याद्वारे मनाला स्वास्थ्य व शांतता लाभते आणि आपल्या व्यक्तिमत्वात बदल होत जातो; हा बदल आपल्याला व इतरांना उपकारक असतो. जीवनाच्या लाटा अंगावर घेऊन त्यांच्यावर सहजी स्वार होणे त्यामुळे शक्य होते. भविष्यावर ताबा मिळवायचा प्रयत्न व्यर्थ असतो, परंतु आपल्या प्रतिक्रियांवर नियंत्रण ठेवले आणि आपल्या विचारांना योग्य दिशा दिली तर भविष्यात आपण कसे असणार आहोत हे ठरत जाते - असे भगवान बुद्ध म्हणत; ते आजही तेवढेच रास्त आहे.'' आज आपण जे आहोत ते आपल्या विचारांचा परिणाम म्हणून आहोत, हे आपण ज्या परिस्थितीत असतो ती आपणच तयार केलेली असते. आपल्या मनातील खोलवर चाललेल्या विचारांमुळे आपल्या हातून कृती घडते, त्या कृतीमुळे आपल्या भोवती विशिष्ट वातावरण तयार होते; आपले आयुष्यही त्यानुसार आकार घेत जाते. हे लक्षात घेतले तर परिस्थितीला आपणच जबाबदार असतो हे पटू शकते.

**''इतरांच्या गरजांबाबत अधिक संवेदनाक्षम व्हा आणि स्वत:च्या गरजांबाबतचा आग्रह सोडून द्या.''** या व्यायामामुळे तुमचा स्वच्छंदीपणा कमी होईल.

*आपल्या वैयक्तिक मागण्यांचे लाड जेवढे जास्त, तेवढा आपला अहंकार वाढत जातो. अशा अहंकारामुळे व स्वकेंद्री इच्छाशक्तीमुळे आपले सर्वांशी संबंध बिघडत जातात आणि आपली असुरक्षिततेची भावना वाढीला लागते.

*आपल्या शरीरानं काय करायचं हे जसं आपण शिकायला हवं तसंच आपल्या मनानं काय करायला हवं हेही शिकावं लागतं. आपल्या आवडी तुम्ही इच्छेनुसार बदलू शकता. ज्यामुळे सुख होते त्या गोष्टी करा; ज्यामुळे दु:ख होते त्या गोष्टी टाळा हा रुढ संदेशही चुकीचा आहे. नावडत्या गोष्टी करतानाही तिच्यात मजा मानता येणे आवश्यक आहे. **आवडीनिवडीबाबतचा आग्रहीपणा ही आपल्या मुक्तजीवनाच्या मार्गातील मोठी धोंड असते. त्यासाठी लवचिकता हवी.** तीव्र आवडी निवडी म्हणजे तीव्र वासना. तीव्र वासना म्हणजे क्रोधाला आमंत्रण. अन्न , काम व माणसं यांच्या बाबतीतल्या आवडीनिवडींचा कडकपणा आपल्या मनोधारणेचा उत्स्फूर्तपणा दडपून टाकणारा ठरतो.

ध्यानधारणेला आरंभ केल्यावर आपल्याला काय काय अनुभव आले त्याचे टप्पे ईश्वरन यांनी पृष्ठ ४९ ते ५६ यावर उलगडून दाखवले आहे.

*ध्यानामुळे जीवनविषयक दृष्टिकोनात बदल होऊ लागतो. **कोणतीच गोष्ट आपल्यापुरती नसते. सर्व गोष्टी जीवनासाठी असतात हे जाणवून प्राधान्यक्रमात फरक पडत जातो.**

*ध्यानामुळे आपल्याला काय मिळतेय हे जाणवल्यावर इतर गोष्टींसाठी देण्यात येणाऱ्या वेळेबाबतचा तरतमभाव वाढत जातो.

*निरंतर टिकणारा आनंद हवा असेल तर छोट्या आनंदावर पाणी सोडायला शिका. ध्यानामुळे तुमच्या जीवनातील प्रत्येक गोष्टीचे सौंदर्य वाढेल. तुमचे जीवन अधिक शांत, उत्साही, निर्मितीक्षम आणि सुरक्षित होईल.

*मनाची शक्ती वाढत जाते. मनाला वाटेल तसे वागण्याची कृती न करण्याएवढी अलिप्तता अंगी येत जाते.

*ताबडतोब प्रतिक्रिया देऊ नका. नकारात्मक भावनांना तिथल्या तिथे रोखून धरा.

## ध्यानातील अडथळे व त्यांचे निराकरण

*स्वार्थी जीवनाच्या प्रवाहाविरुद्ध पोहत जाणे याला भगवान बुद्ध पतिसोनागामी असे म्हणतात. स्वतंत्र होण्यासाठी आपल्याला आपण गृहीत धरलेल्या त्याचत्या विचारांच्या चौकटीतून सुटका करून घ्यायला हवी. (६५) आनंद व दु:ख या भावनांच्या जंजाळातून बाहेर पडून आपल्या मज्जासंस्थेची संपूर्ण पुनर्बांधणी करायला हवी. मज्जासंस्थेला लागलेली एकतर्फी वाहतुकीची सवय मोडायला हवी.

*स्वत:च्या मनावर ताबा मिळवणे हे सर्वात कठीण काम आहे. ध्यानामध्ये अडथळे आणणाऱ्या इतर विचारांबरोबरची ही प्राथमिक मारामारी म्हणजे पुढे येणाऱ्या मोठ्या लढाईची तयारी असते. सुप्त अंतर्मनाच्या डोहात नकारात्मक विचारांच्या वेगवान प्रवाहांमुळे भोवरे उठत असतात. ते प्रवाह बदलण्यासाठी मोठी लढाई करावी लागते. हा पराक्रम म्हणजे चमत्कारच असतो. पण तो ज्या प्रकारे साध्य केला जातो त्यात मात्र चमत्कार असू शकत नाही. त्यामागे कठोर परिश्रमच असतात.



*आध्यात्मिक विकास ही झटपट घडणारी गोष्ट वा कविकल्पना नाही. ध्यान आणि दैनंदिन जीवन एकमेकांना आधार देत राहिले तर आध्यात्मिक विकासाचा वेग वाढेल.

*तुमची ध्यानधारणा जसजशी वाढत जाईल तशी तुम्हाला अधिक चांगली झोप येत जाईल. मात्र ध्यान करताना झोप येत असेल तर ताठ बसा व झोपेला थोपवा.

*भगवद्गीतेतील एक श्लोकाचा अर्थ आहे - जे नेहमी स्वत:च्या इच्छा, वासना पूर्तीच्या मागे असतात त्यांना ह्या आयुष्यात कधीच शांतता लाभत नाही.

*स्वामी रामानुज म्हणतात : आपलं सर्वात उच्च ध्येय हे आपण स्वत:ला कोण समजतो यावर अवलंबून असतं. आपलं शरीर म्हणजेच आपण असं मानणाऱ्यांना शारीरिक समाधान मिळवण्यापलीकडे काय ध्येय गवसणार? शरीर व व्यक्तिमत्त्व या शारीरिक व जैवरासायनिक यंत्रापलीकडे आणखी काहीतरी आपण आहो हे जाणून घ्यायला हवे. **व्यक्तिमत्त्वाचा पाया शारीरिक नसून आध्यात्मिक असतो - हे कळले की बरेचसे शारीरिक प्रश्न दूर होतात.**

*स्वत:ची पुनर्रचना करण्यासाठी लागणारे गुण (चांगुलपणा, प्रेम, निर्भयता, इ.) हे आपल्याच अंतर्मनात खोलवर रुजवलेले असतात. ते कुठून बाहेरून आणावे लागत नाहीत.

**मनाला मुक्त करताना पाच अडथळे पार करावे लागतात** असे भगवान बुद्धांनी म्हटले आहे. विषयासक्ती, शत्रुत्वभावना, आळशीपणा, चंचलता आणि चिंता (भीती). हे अडथळे आपल्याला जागृतीपासून दूर ठेवतात. बुद्ध हा एक प्रभावी आध्यात्मिक शास्त्रज्ञ आहे. आपल्या भावनांचे आनंददायी, दु:खदायी व तटस्थ असे वर्गीकरण त्यांनी केले आहे.

या अडथळ्यांना पार करण्यासाठी भगवान बुद्धांनी **पाच व्यूहरचना** सांगितल्या आहेत. मानसिक कौशल्यांच्या गतिशास्त्राच्या भाषेत त्या बसवता येतात.

१.एका विचाराच्या जागी दुसरा विचार ठेवणे

२.मनन चिंतन करणे - तीव्र भावना वासना उफाळून आल्यास थोडे थांबा. त्या भावनेच्या आहारी गेल्यास होणाऱ्या परिणामांचा विचार करा.

३.एखाद्या गोष्टीतून लक्ष काढून घेणे किंवा तिच्याकडे लक्ष न देणे.

४.मूळापाशी जा. अडचणीचं मूळ कारण असलेल्या इच्छाशक्तीचे स्वरूप समजावून घ्या.

५.अभिनिग्रह करा.तुमच्या अडचणीचं मूळापासून निराकरण करा. त्या नक्की नाहीशा झाल्या आहेत याची खात्री करून घ्या.

ईश्वरन हे श्रीकृष्णाला आपला आध्यात्मिक आदर्श मानतात. त्याचा भगवद्गीतेतील उपदेश हा परिपूर्ण आध्यात्मिक जीवनाचा जणू पाया आहे.

ईश्वरन यांना सेंट फ्रॉन्सिसची एक प्रार्थना अत्यंत प्रिय आहे. आपल्या प्रशिक्षणवर्गाला प्रारंभ करताना ते त्या प्रार्थनेचा आग्रह धरतात.

*परमेश्वरा, मला तुझ्या शांततेचं साधन कर.*
*जिथं द्वेष असेल तिथं मला प्रेमाची प्रेरणा करू दे.*
*जिथं इजा असेल, तिथं क्षमा*
*जिथं संशय असेल, तिथं प्रेम*
*जिथं अंधार असेल तिथं प्रकाश*
*जिथं दु:ख असेल तिथं आनंद*

*हे प्रभो, मला वद्वान दे*
*लोकांनी माझं सांत्वन करावं असं मला वाटू देऊ नको*
*उलट लोकांचं सांत्वन करण्याची क्षमता मला दे.*
*लोकांनी मला समजून घ्यावं असं मला वाटू देऊ नको*
*उलट लोकांना समजून घेण्याची क्षमता मला दे.*
*लोकांनी माझ्यावर प्रेम करावं असं मला वाटू देऊ नको.*
*लोकांवर प्रेम करावे अशी क्षमता मला दे.*
*कारण काही दिलं तरच आपल्याला काहीतरी मिळतं.*
*आपण क्षमा केली तरच आपल्याला क्षमा केली जाते.*
*आपण मरण भोगले तर आपल्याला अमरत्व प्राप्त होते.*


ईश्वरन यांचे हे पुस्तक आपल्याला प्रेरणादायक वाटेल. आपल्या मनावरची बुद्धीवरची गैरसमजाची जळमटे दूर करील. मनाला मुक्तता मिळवण्यासाठी आपल्या पूर्वग्रहांचे ओझे धुडकावून द्यायला हवे. ध्यानाच्या द्वारे हे काम सुलभ होऊ शकते. मुक्तीच्या मार्गातले अडथळे दूर होऊ शकतात. आपल्या जीवनात अक्षय आनंदसुखाचे अंत:प्रवाह मग अविरत संचार करू लागतात.

द वर्ल्डस् रिलिजन्स या प्रो. हस्टन स्मिथ यांच्या पुस्तकाचा आधार घेऊन आपल्या उपनिषदांत ऋषिमुनींना माणसाच्या अंतरंगात प्रवेश करण्याचा, तिथे आपल्या इच्छेप्रमाणे विहार करण्याचा आणि तिथे लागलेले शोध परत येऊन इतरांना सांगण्याचा मार्ग सापडलेला होता व हे करण्याचा परंपरागत वारसा येथे दीर्घकाळ चालत आलेला होता असे ईश्वरन सांगतात, प्राचीन काळी भारतात ध्यानधारणेद्वारे आपल्या अंतरंगाच्या अमर्याद अवकाशात स्वैर संचार करणारे 'आत्मानॉटस' अस्तित्वात होते आणि ते जाणिवेच्या अवकाशात संचार करून दैवी आत्म्याचा शोध घेऊ शकत होते अशी त्यांना खात्री वाटते. उपनिषदांतील काही वर्णने या दृष्टीने अर्थपूर्ण आहेत. '' मोठमोठ्या आकाशगंगांमध्येही न मावणारा माझा प्रियतम माझ्या छोट्याशा हृदयात राहतो'' असे सुफी संत सांगतात. जेव्हा आपला आत्मा ह्या तेजाने तळपत असतो तेव्हा इतर सर्व गोष्टीही आपल्याला तेजस्वी भासू लागतात.''

आपल्यातील परमात्म्याची ओळख पटण्यासाठी ध्यानधारणेचा मार्ग हाच सर्वोत्तम ठरतो असे पुन:पुन्हा ठासून सांगणारे हे विवेचन जिज्ञासूंना प्रेरणादायक वाटेल.

**पृष्ठे : १६८ किंमत : १२५ रु. सभासदांना :९४ रु. पोस्टेज :२०रु.**


## नवे.. कोरे..





तालिबानी राक्षसांचा उन्मत्त अभिमान, आंधळा द्वेष आणि पराकोटीच्या जहरी वैराच्या कल्लोळातही माणुसकीची अमृतवेल फुलवणाऱ्या एका छोट्या अफगाण मुलीची विलक्षण कथा

**द ब्रेडविनर**

मूळ लेखिका - डेबोरा एलीस अनुवाद - अपर्णा वेलणकर

किंमत - **१०० रू.** सभासदांना - **७५ रू** पोस्टेज - **२०रू.**




**मन:शांती, आरोग्य, यश, चित्तशुद्धी आणि आध्यात्मिक साधना - यासाठी हवी ध्यानधारणा**

# निरामय यशासाठी ध्यान

**शुभदा गोगटे**

आजच्या धावपळीच्या जीवनात आपले स्वास्थ्य आणि मन:शांती टिकवून धरणे अवघड होत चालले आहे. दैनंदिन ताणतणावांमुळे वेगवेगळ्या व्याधींना तोंड द्यावे लागत आहे. त्यावर तोडगा म्हणून ध्यान, मेडिटेशन, विपश्यना, प्राणायाम, योगासने, नामजप वगैरेंचा अवलंब करण्याचा सल्ला दिला जातो. त्यासाठी शिबिरे घेण्यात येतात. वेगवेगळ्या ध्यानपद्धतींचा पुरस्कार केला जातो. आपण कोणत्या ध्यानपद्धतीचा अवलंब करावा असाही प्रश्न पडतो. मनाचा गोंधळ उडतो.

हा गोंधळ कमी करण्यासाठी शुभदा गोगटे यांचे 'निरामय यशासाठी ध्यान' हे छोटे पुस्तक काही प्रमाणात तरी उपयुक्त ठरेल.

स्वत: शुभदा गोगटे गेली काही वर्षे ध्यानधारणा करीत आहेत आणि त्यामुळे मानसिक व शारीरिक दृष्ट्या आपली तंदुरुस्ती टिकून राहिली आहे असे वाटते.

ध्यानामुळे बरे वाटते. मन शांत राहते. आरोग्य व यश यासाठी मन शांत आणि तणावरहित असावं लागतं. आणि त्यासाठी ध्यानाचा उपयोग होतो असा त्यांचा अनुभव आहे. ध्यानधारणेत आपण फार मोठी मजल मारलेली आहे किंवा कुंडलिनी जागृती वगैरे अवस्था गाठलेली आहे असा त्यांचा दावा नाही. एक साधक म्हणूनच ध्यानाबद्दल सर्वसामान्य वाचकांना मार्गदर्शन करण्याच्या हेतूने त्यांनी हे पुस्तक लिहिलेले आहे.

प्रथम ध्यान म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर त्यांनी देण्याचा प्रयत्न केला आहे.

मेडिटेशन व ध्यान हे शब्द त्या समानार्थी वापरतात. ध्यान, चिंतन, मनन, या सर्वांचा त्यात अंतर्भाव होतो. ध्यानामुळे मन शांत होते, चित्त समतोल व स्थिर राहते, रक्तदाब वगैरे व्याधी काबूत राहतात, त्याशिवाय अन्य काही आध्यात्मिक व अतींद्रिय अनुभवही येऊ शकतात. पण त्याकडे अनुषंगिक फायदा म्हणून त्या पाहतात. ध्यानाने मिळणाऱ्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर

## पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

- ध्यान करण्याच्या विविध धर्मातील वेगवेगळया पद्धतींची माहिती
- गौतम बुद्ध यांना ध्यानातून ज्ञानप्राप्ती झाली.
- सिल्व्हर माइंड कंट्रोल पद्धत, कल्पनाचित्रण पद्धत.
- ध्यान करण्याचे तंत्र
- शरीरातील षट्चक्रांद्वारे सुप्त शक्तींना जाग येते.

जास्त आहे. त्यांचा भर ध्यानाने आपली एकाग्रता वाढते, स्मृती सुधारते, चिकाटी वाढते, चित्ताची समधातता साधते, मेंदूतील विद्युत तरंगांची गती संतुलित राहून मन शांत व सजग राहते.

हिंदू धर्मात ध्यानधारणेला महत्त्व आहे. चित्तवृत्तिनिरोध साधणे म्हणजे योग; यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी ही योगाची आठ अंगे असल्याचे महर्षी पतंजली यांनी योगसूत्रात सांगितले आहे.

गौतम बुद्ध यांना ध्यानातून ज्ञानप्राप्ती झाली व 'बौद्धत्व' लाभले. फालुन गाँग (धर्मचक्राचं पालन करण्यासाठी ध्यान), झेन बुद्धिझम, विपश्यना असे वेगवेगळे ध्यान प्रकार बौद्धधर्मात आढळतात.

जैन धर्मातही सामायिक ध्यान पद्धतीला महत्त्व आहे.

महर्षी महेश योगी यांनी ट्रॅन्सेंडेंटल मेडिटेशन (टीएम) भावातीत ध्यान या पध्दतीचा पुरस्कार केला. गुरूने शिष्याला बीजमंत्र देणे व मनोमन वा मोठ्याने त्याचा उच्चार करीत मंत्राच्या ध्वनीवर लक्ष केंद्रित करणे हे याद्वारे रिलॅक्सेक्शन साधते आणि उच्च रक्तदाब, हृदयविकार, मानसिक तणाव, जन्मव्याधी यांची तीव्रता कमी होते असे प्रयोगान्ती सिद्ध झाल्याचा त्यांचा दावा आहे.

ओशो रजनीश हे ध्यान हाच धर्म मानतात. स्वर्षाप्रकाश ध्यान, विसावा ध्यान हे प्रकार त्यांनी प्रचलित केले,

सिल्व्हर माइंड कंट्रोल पद्धत आणि कल्पनाचित्रण पद्धत या विशिष्ट हेतू मनात ठेवून त्यांच्या प्राप्तीसाठी वापरल्या जातात. डॉ. ऑर्निश हे हृदयरोग्यांसाठी कल्पनाचित्रण पद्धतीचा वापर करतात.

ध्यानामुळे मानसिक ताणतणाव, उच्च रक्तदाब, निद्रानाश, तोतरेपणा, डोकेदुखी, व्यसनासक्ती यात घट होते. तर शांतपणा, आशावाद, उत्साह, सकारात्मक दृष्टिकोन, स्वयंशिस्त, आत्मसन्मानाची भावना यात वाढ होते.

ध्यान कुठे करावे, किती वेळ करावे, कसे करावे, ध्यान करताना कोणते आसन घालून बसावे, श्वासोच्छ्वासावर लक्ष कसे केंद्रित करावे, ध्वनी, अंत:प्रतिमा, मूर्ती वा प्रतिमा यावर लक्ष केंद्रित केल्यास काय होते, शरीरांतर्गत षट्चक्रे कोणती, ध्यानाने त्यांच्यातील सुप्त शक्तीला जाग कशी येऊ शकते वगैरे शंकांचेही समाधान पुस्तकात करण्यात आले आहे.

ध्यानधारणेच्या प्रसारासाठी आज अनेक संस्था जागतिक पातळीवर कार्यरत असून त्यांचा व्याप प्रचंड वाढलेला आहे. रुग्णालयांमध्येही इतर औषधांबरोबर ध्यानधारणेचाही उपचार आता मान्यता मिळवत आहे. हे पुस्तक ध्यानधारणेची सर्व अंगे वाचकांना स्पष्ट दाखवणारे असल्याने उपयुक्त ठरेल.

**पृष्ठे : १०४ किंमत : ७०रु. सभासदांना :५३रु. पोस्टेज :२०रु.**

## नवी स्पर्धा

# शब्दकोडे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ना | कि | स | मा | ली | य | यो | गी |
| चिं | त | न | य | ज | त्युं | मृ | त |
| शा | सी | ज | रा | बि | ळ | ढ | ने |
| ऋ | दि | ज | सा | का | ल | शे | कां |
| तु | वा | वी | ते | मो | र | च | गा |
| रा | छा | र्ष | रा | ध | न | सि | तू |
| ज | घ | व | गं | क | त | से | या |
| सं | ळा | यु | ण | चिं | अ | चं | गा |

शेजारील चौकोनात ''राजयोगी'' शिवाजी सावंत ''ऋतुराज'' वसंत बापट यांच्या १६ पुस्तकांची नावे ओळखा व बक्षीस जिंका.

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके बक्षीस.


रचनाकार : मनोहर बांदेकर

**उत्तरे पाठवण्याची मुदत १५ नोव्हेंबर २००२**

**बक्षीस जिंकण्यासाठी मेहता मराठी ग्रंथ जगतचे सभासद असणे आवश्यक.**

आमचा पत्ता :

**मेहता मराठी ग्रंथ जगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.




## तीन तीन ओळीत उभे राहणारे भावभावनांचे विविध रंगी नाट्य

# त्रिवेणी

**गुलज़ार**

**अनु : शान्ता शेळके**

कवी गुलजार यांच्या 'रावीपार' या कथासंग्रहाचे स्वागत मराठीत उत्तम प्रकारे झाले. फाळणीनंतरचे दाहक अनुभव आणि मुंबईच्या चित्रपट जगतात पाय रोवण्याच्या प्रयत्नातील अडीअडचणी यांचे त्या कथांमधून होणारे दर्शन संवेदनाशील मनाचे तरल आविष्कार घडविणारे आणि अस्वस्थ करणारे होते.

गुलजार यांनी तीन तीन ओळींच्या रचनांचा आकृतिबंध समोर ठेवून १९७२-७३ साली बऱ्याच कवितांचे लेखन केले. त्या रचना सारिका या मासिकातून प्रसिद्धही झाल्या. या विशिष्ट आकृतिबंधाला त्यांनी त्रिवेणी हे नाव दिले. दोन ओळींचा शेर; तसा तीन ओळींचा हायकू. परंतु गुलजार यांनी 'हायकू' चे अनुकरण न करता, तीन ओळींच्या या रचनाबंधाला त्रिवेणी हे भारतीय नाव दिले. त्रिवेणी म्हणजे तीन नद्यांचा संगम. गंगा-यमुना या दोन नद्यांप्रमाणे या रचनाप्रकारात पहिल्या दोन ओळींचा संगम होतो व एक संपूर्ण कविता तयार होते. परंतु या दोन प्रवाहांखालून आणखी एक नदी म्हणजे सरस्वती वाहत असते; असे आपण मानतो; आणि ही सरस्वती नदी गुप्त आहे, ती डोळ्यांना दिसत नाही असाही सर्वमान्य समज आहे. सरस्वती म्हणजे ही तिसरी काव्यपंक्ती. ती पहिल्या दोन पंक्तींमध्येच कुठेतरी लपलेली असते, असे स्पष्टीकरण कवी गुलजार देतात.

त्रिवेणी हा काव्यसंग्रह आता मराठीतही आला आहे. शांता शेळके यांनी त्याचा अनुवाद केला आहे; तो संग्रह प्रसिद्ध झालेला पाहण्यास मात्र त्या आज आपल्यात नाहीत याची हळहळ वाटत राहील. कवी गुलजार यांनी हा संग्रह शांता शेळके यांनाच अर्पण केला आहे. ही अर्पणपत्रिकाही 'त्रिवेणी' च आहे.

**आप सरस्वती की तरह ही मिली**
**और सरस्वती की तरह ही गुप्त हो गयी।**
**ये त्रिवेणी आपही को अर्पित कर रहा हूँ ।**

कवी गुलजार यांची शांताबाईंशी प्रत्यक्ष गाठ पडलेली नव्हती. परंतु त्यांनी फोनवर काही अनुवाद वाचून दाखवले तेव्हा गुलजार यांनी ते अनुवाद आवडल्याचे सांगितले. तेवढाच त्यांचा संवाद झाला.



### पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

- तीन ओळींच्या काव्यरचना म्हणून त्रिवेणी हे अस्सल भारतीय नाव
- दोन ओळींनी पूर्णभाव व्यक्त केल्यावर त्यात लपलेला गूढ अर्थ प्रकट करणारी तिसरी ओळ
- गंगा-जमुना यांचा संगम, तर सरस्वती गुप्त असा हा त्रिवेणी संगम
- नाट्यपूर्ण, विनोदी, मिस्किल आशय

त्रिवेणी या आकृतिबंधाची वैशिष्ट्ये ध्यानात यावी म्हणून काही रचना वानगीदाखल उद्धृत कराव्याशा वाटतात.

*आजचा पेपर इतका भिजलेला कसा ?
उद्यापासून हा पेपरवाला बदलून टाका.
'या वर्षी पाचशे गावे पुरात वाहून गेली!' (पृष्ठ ३)

*या, सारेजण आरसेच वेढून घेऊ अंगभर
साऱ्यांना आपलाच चेहरा दिसत राहील त्यात
आणि साऱ्यांना सारेच सुंदर वाटतील इथे ! (पृष्ठ ११)

*आली समोरून, पाहिले, बोलली दोन शब्द
हसली सुद्धा! सारे लाघव जुन्या ओळखी खातर
कालचा पेपर होता, उघडून पाहिला, ठेवून दिला (पृष्ठ १३)

*किती दोस्त होते माझे असायचे सतत माझ्या बरोबर
आले कुणी, घेऊन गेले त्यांना, पुन्हा आलेच नाहीत ते.
फळीवरून काढलेल्या पुस्तकांची जागा पडली आहे रिती. (पृष्ठ २९)

या तीन ओळींमध्ये यमक वगैरे बंधनांचा अडसर नाही. पहिल्या दोन ओळीत एक विधान केलेले असते वा निरीक्षण नोंदवलेले असते. तिसऱ्या ओळीत त्यावरचे चिंतनात्मक, भाष्य त्याचे कारण वा त्याचे स्पष्टीकरण दिलेले असते; असे स्थूलमानाने म्हणता येईल. तिसऱ्या ओळीमुळे पहिल्या दोन ओळींतील आशय अधिक गडद व व्यापक होतो. मानवी जीवनातल्या अनेक घटनांची एक वेगळीच संगती त्यामुळे लागते. वेगळेच वास्तव पुढे येते.

प्रवासात आपल्याला कधी कधी मागे फिरावेसे वाटते, तरीही आपण पुढे जातच राहतो; का? ''तर रस्ते पावलात दोरीसारखे गुरफटत राहतात'' (६१) असे कवीला जाणवते.

## वीरपत्नीच्या वेदना

जवान धारातीर्थी पडतात. शहीद होतात; आणि त्यांच्यामागे उरणाऱ्या त्यांच्या वीरपत्नींच्या वेदनांना अंत नसतो ही भावना व्यक्त करताना गुलजार एका त्रिवेणीत म्हणतात:

*काटेरी तारेवर वाळत टाकले आहेत कुणी ओले कपडे*

*ठिबकते आहे थेंब थेंब रक्त वाहून जाते आहे मोरीतून...*

या दोन ओळीतून उभ्या राहिलेल्या दृश्याचा अर्थ काय होतो हे तिसऱ्या ओळीमधून एकदम अनपेक्षित प्रश्नाच्या रूपात समोर येते

*''काय त्या जवानाची विधवा रोज धुते । त्याचा सैनिकी वेष इथे ?''*

तो जवान रणांगणावर रक्तबंबाळ होऊन पडला; पण त्याच्या मागे राहिलेल्या त्याच्या वेषातून रक्त गळणे थांबत नाही. त्याच्या कुटुंबियांच्या जखमा तशाच भळभळत राहतात हे किती मार्मिकपणे येथे प्रकट झाले आहे!

## विनोदासाठी वापर

कधी कधी त्रिवेणीचा वापर विनोदासाठीही होतो.

*जे लिहाल त्याची साथ देईन मी बिनचूक*

*माझी किंमत तर चेहऱ्यावरच लिहिलेली आहे.*

या दोन ओळींमुळे थोडाफार कोड्यात पडलेला वाचक तिसरी ओळ वाचल्यावर खुदकन स्वत:शीच हसल्याशिवाय राहणार नाही. काय आहे ही तिसरी ओळ?

*''साधे पोस्टकार्डच आहे ना मी ?''*

ही तिसरी ओळ जो गौप्यस्फोट करते त्यामुळे पहिल्या दोन ओळींचा अर्थ कसा लावायचा याबद्दल मनावर पडलेला ताण एकदम दूर होऊन, उखाणा समर्थपणे सुटल्याचा आनंद चेहऱ्यावर खुलतो.

असे काव्यपूर्ण पण मिस्किल प्रश्न या त्रिवेण्यांमध्ये खूप धमाल उडवतात. ''खिडक्या बंद, दारांना कुलूप असे असूनही त्या घरात स्वप्ने पुन:पुन्हा कुठून येतात?'' ह्या प्रश्नांचे उत्तर देताना गुलजार आणखी एक प्रश्न पुढे करतात, '' झोपेतही एखादा झरोका खुलाच असतो की काय?''

## प्रेयसीची आठवण

हँगरवरचा कोट बऱ्याच दिवसांनी काढला तर त्याच्या कॉलरवर एक लांबलचक केस सापडला - या दोन ओळीतल्या वर्णनानंतर तिसरी ओळ स्पष्टीकरण देते - ''गेल्या हिवाळ्यात हा कोट अंगात घातला होता - ते आठवले'' प्रेयसीच्या शेवटच्या भेटीला किती दिवस झाले याचा हा सूचक उल्लेख रसिकपणाला गुदगुल्या केल्याशिवाय राहणार नाही.

आपले खूप दोस्त होते. ते एकेकाळी सतत बरोबर असत. पण कोणीतरी त्या मित्रांना घेऊन गेले आणि पुढे त्यांचे दर्शन दुर्मिळ झाले. - फळीवरून काढलेल्या पुस्तकांची जागा अजूनही रिकामीच आहे... येथे मित्रांनी वाचायला म्हणून नेलेल्या व परत न केलेल्या पुस्तकांबद्दलची ही कैफियत आहे हे लक्षात येते आणि कवीच्या जीवनात ग्रंथांच्या मैत्रीचे मोल किती आहे हे तीव्रतेने जाणवून जाते.

अशी तरल काव्यात्म कल्पनांनी या रचनांना अमाप गोडवा लाभलेला आहे.

आपण या आयुष्यालाच घाबरतो; कारण कोण कुठून कसा घाव घालील याचा नेम नाही; असे कवी म्हणतो. खरे तर लोक मृत्यूला घाबरतात; पण कवीला मृत्यूचे भय वाटत नाही. का ?



तो तर एकदाच मारून टाकते !''

कवीच्या कवितेतील दु:खाची वर्णने वाचून कोणी रसिक मरून जाईल; पण चांदणे रात्रभर झगमगतच राहील असे मानणारा हा कवी एकदा बाजारात जाते; मालाची किंमत रास्त असते पण खिशात पुरेसे पैसे नसतात त्यामुळे त्याला तसेच परत यावे लागते. त्यावेळी त्याला जुनी घटना आठवते.

''असाच एकदा तुझ्याकडून आलो होतो तुला हरवून''.

तीन ओळीत एक संपूर्ण कथाच अशा अलगद समोर येते.

गुलजारच्या या रचना अशा नानाविध भावभावनांनी भरलेल्या आहेत. बहरलेल्या आहेत.

साधी साधी दृश्ये रंगवत त्या एकदम मानवी जीवनावर सखोल अर्थपूर्ण गंभीर भाष्य करून जातात. कुठून आपण कुठे फेकले जातो - कळतच नाही.

कुठलेही पान उघडावे आणि त्यावर त्रिवेणीचे वाचन करावे; त्यातून प्रकट होणाऱ्या अर्थपूर्ण आशयातल्या नाट्यात हरवून जावे. अशा या अल्पाक्षरी पण रमणीय रचना झपाटून टाकणाऱ्या; सामान्य व्यवहारामागचे विशाल सूत्र प्रकट करून चक्रावून टाकणाऱ्या...

'त्रिवेणी'वाचून तुम्ही गुलजारच्या प्रेमात न पडला तरच नवल!

**पृष्ठे : ६४ किंमत : ६०रु. सभासदांना :४५रु. पोस्टेज :२०रु.**


# दिवाळी अंकात

**जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या , वेगळा अनुभव देणाऱ्या नमुनेदार व्यक्तींचे दर्शन**

डॉ. आनंद यादव, भा. द .खेर, द. ता.भोसले,चंद्रकांत बांदिवडेकर, राजेंद्र प्रभुणे, कांचन घाणेकर, प्रभाकर पेंढारकर, सुवर्णा दिवेकर, सुमेध वडावाला, सुनीती देशपांडे,माधवी देसाई व इतर.

**इतर भारतीय भाषांतील दिग्गज लेखकांचा साहित्य परिचय**

डॉ.एस.एल.भैरप्पा, रवींद्रनाथ टागोर, यू.आर.अनंतमूर्ती, अरूंधती रॉय, प्रतिभा राय,कमलेश्वर, गुलजार, तसलिमा नासरिन

**इंग्रजी बेस्ट सेलर्स लेखकांचा परिचय**

जॉन ग्रिशम, ॲलिस्टर मॅक्लीन, डेव्हीड बेल्डासी, जेम्स पॅटरसन


**विज्ञान लेखक - निरंजन घाटे यांची मुलाखत**

**व इतर कोडी , स्पर्धा आणि नवनवीन योजनांची बरसात...**

आजच वर्गणीदार व्हा. व वर्गणीतच दिवाळी अंकही मिळवा.

वार्षिक वर्गणी - ८० रु. ३वर्षांची - २०० रु. ५ वर्षांची - ३०० रु.


दिवाळी अंकात
दिवाळी अंकात
दिवाळी अंकात




## ओव्यांमधून प्रकट होणारे ग्रामीण स्त्री जीवनाचे अथांग मानस सरोवर

# मालनगाथा : २

**इंदिरा संत**

'मालनगाथा' द्वारे इंदिरा संत यांनी ग्रामीण भागातील स्त्रियांच्या तोंडी असणाऱ्या ओव्यांचे संकलन करून त्यातील आशय आणि शैलीचे सौंदर्य उलगडून दाखवले आहे. 'मालनगाथा' चा पहिला भाग १९९८ मध्ये प्रसिद्ध झाला. आता दुसरा भाग वाचकांच्या हाती पडतो आहे. तो पहायला इंदिरा संत आज आपल्यात नाहीत; ज्या दुर्गा भागवतांना तो अर्पण करण्यात आला आहे त्याही काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. त्यामुळे या पुस्तकातील गाथा वाचतानाही मन थोडेफार सैरभैर झाल्याशिवाय राहत नाही.

इंदिरा संत यांनी या ओव्यांचे संकलन तवंदी या आपल्या गावी कॉलेजच्या दिवसात केले. बेळगाव - कोल्हापूर हमरस्त्यावर तवंदीचा घाट आहे, आणि डोंगरमाथ्यावर तवंदी हे इनामी खेडे आहे. त्याच्या पायथ्याशी एक ब्रम्हदेवाचे देऊळ आहे. जैन धर्मीयांचेही ते एक तीर्थस्थान मानले जाते. तेथे भागाबाई ही कामवाली बाई जात्यावर दळताना ओव्या म्हणत असे; त्या ओव्या इंदिराबाई मोठ्या आवडीने ऐकत आणि पुढे त्या ओव्या लिहून ठेवण्यास त्यांनी आरंभ केला.

'' चांदीच्या ताटामंदी फूल दाशालाचं लाल । त्याच रंगाची चोळी धाड बंधूराया'' ही ओवी ऐकून चांदीच्या ताम्हनात जास्वंदीचे ताजे फूल त्यांनी खरोखर ठेवून ते दोन्ही बाजूंच्या नंदादीपाच्या समयांच्या प्रकाशात पाहिले; तेव्हा त्या मालनीला केवळ लाल रंगाचा रेशमी खणच हवा होता असे नव्हे तर रेशमी खणाच्या नऊ तुकड्यांची चोळी आपल्या गोऱ्या कायेवर, दंडावर आणि पाठीच्या फाकांवर कशी रसरसून दिसेल याचीही तिला जणू खात्री होती - हेही या ओळीतून स्पष्ट होत होते हे जाणवले.

जात्यावरच्या त्या ओव्या लिहून ठेवण्याचा परिपाठ त्यांनी ठेवला. आपल्या बी एडच्या विद्यार्थिनींनाही त्यांनी आपापल्या खेड्यातील बायकांच्या तोंडी असणाऱ्या ओव्या लिहून आणण्यास सांगितले.... अशा प्रकारे मिळालेल्या ओव्यांचे पुढे काय करावे याचा विचार सुरू झाला ; आणि त्यांचे वर्गीकरण भावबंधाच्या अनुषंगाने करण्याची कल्पना सुचली.



**पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...**

- जात्यावरच्या ओव्यांचे संकलन करून त्यांची भावबंधांनुसार केलेली आकर्षक मांडणी
- त्या भावबंधांच्या अनुषंगाने इंदिरा संत यांची उलगडून दाखवलेले स्त्रीमनाचे गूढ गहन कप्पे
- भारतीय स्त्रीचे पारंपारिक भागधेय आणि भावविश्व
- पती, सासर, माहेर, प्रणय, पाऊस, शेत, शृंगार, दागिने, लग्न, मूल - विविध अनुभवांचा विस्मयकारक आवाका

आईबद्दलच्या भावबंधांच्या ओव्या वेगळ्या करून त्यातून जाणवणारे आईचे प्रेम, आईचे दुःख, आईचे मोठेपण वगैरे भावबंध टिपले. नंतर बापाचे कर्तेपण, त्याचे कठोर व कोवळे मन भावबंध प्रकट करणाऱ्या ओव्यांचा वेगळा गट केला. प्रत्येक ओवी हा एक भावाचा आविष्कार; त्या भाववृत्तींच्या कविता करता येतील; प्रत्येक ओवी ही रांगोळीच्या ठिपक्यासारखी स्वयंपूर्ण व ठसठशीत; तर या ओव्यांचे ठिपके मांडून त्यांची रांगोळी चितारता येईल आणि ती अधिकच आशयसंपृक्त होईल - असाही आकृतिबंध समोर आला. त्यातून मालनगाथेची निर्मिती झाली. 'मालन'च्या अवघ्या आयुष्याची कहाणी या एखादा चित्रपटासारखी मग उभी राहिली.

पुस्तकाच्या रूपात या मालनगाथांचा पहिला आविष्कार व्हायला इंदिराबाईंची सत्तरी उजाडली.

मालनगाथाच्या दुसऱ्या भागात एकूण चार भावबंधांचे गाथागंठन आहे. वर्षागान, मालनीचा साजशृंगार, प्रणय चंद्राच्या कला आणि स्त्रीजन्माचे भोग यावर भर देणाऱ्या एकूण ४७ गाथांचा आणि २०० ओव्यांचा ऐवज सामावलेला आहे.

| | |
|---|---|
| कुंकवाची चीरी | कोरायाचा भारी त्रास |
| सोस ग माझ्या सई | कंथासाठी सासुरवास |
| भरताराचा राग | जसा इस्तव इंगळ |
| सई मालिनी ग सासे | तेची मरजी सांभाळ |
| काळी चंद्रकळा | नेस, ग रंगासाठी |
| सई, ग मालनी | सून सोसावी लेकासाठी |
| भावज गुजरी | नीरीनं पीठं लोटी |
| अन्योव सोस सारा | आपल्या ग बंधूसाठी |
| सोसून सोसून ग | जीव करावा तडीपार |
| लेकी, नको, ग परतून | जल्म सासर मरण |

या गाथेत मालनीने अस्तुरीच्या एकूण आयुष्याचेच सार प्रकट केले आहे असे इंदिराबाई म्हणतात. आपल्या कन्येला तिने पुढे कसे वागावे याचा उपदेश करताना अंतर्मुख होऊन आई स्वत:च्या आयुष्याचाही जणू ताळेबंद मांडते. आपल्या आईचा, आपल्या सखी शेजारणीचा जीवनपटही तिला दिसू लागतो. त्या सर्वांची गोळा बेरीज तिला जी दिसते, ती या गाथेतून उफाळून येते.

''सईबाई, अस्तुरीच्या जल्माला आली आहेस. तुझे आयुष्य सोसण्यासाठी आहे. जे जे वाट्याला येईल ते सोस, सहन कर. पण सोसशील त्यात आर्त नको. मंगल असू दे. ते एक प्रकाशपूजन असू दे. सासुरवास सोसताना सौभाग्यचिन्ह जे कुंकू, त्याची चीर कोरते आहे असे समज. कंथाचा संताप, त्रास सोस पण मी पत्नीधर्माने त्याची मर्जी सांभाळते आहे हे एक प्रकारचे वात्सल्य मनाशी धर. मुलाच्या संसारात तुला जो त्रास, जी हेटाळणी भोगावी लागेल ती चंद्रकळा असे समज. रंगासाठी नेसलेली, पोटच्या पोराच्या मायेखातर नेसलेली. मायबाप गेले की माहेर उरत नाही. पण भावजयीने पायाने तुला बसायला पाट सारला तरी तो अपमान, तो अन्याय भावाची बहीण म्हणून सोस आणि भावासाठी माहेरी एखादी खेप घाल '' अशी सहनसिद्धी संपादन करत तडीपार व्हायचे; पुन्हा तो जन्म नको, माहेर नको, सासर नको.

भारतीय स्त्रीच्या प्रातिनिधिक भागधेयाचे हे जणू वर्णन आहे.

पावसाळ्याबद्दल भारतीय मालनीला विशेष अगत्य आणि आत्मीयता. पावसावर अवघे जीवन अवलंबून. पाऊस वेळेवर आला तर शेते पिकणार. धनधान्य घरात येणार. गुरांना चारापाणी मिळणार. म्हणून त्याला ती साकडे घालते. ''पडपड तू पावसा वाट पाह्यताती सारं'' या पावसाची वेगवेगळी रूपेही ती न्याहाळते. ''पानी वरून पडतं तूर बारावर आली, बागल्या फांद्या खाली..''अशी शेतातल्या तरारलेल्या पिकांची हालचाल ती टिपते. लक्ष्मीला मग ती मोत्याचं आसन देऊ करते. बारा बलुत्यांचे धान्याचे वाटे वेगळे काढते. गुऱ्हाळ घराला भेट देऊन भावाच्या समृद्धीवर सुखावते. गोठ्यातल्या धनसंपदेचे गुणगान करते. ''चाल चाल शिंगी बाई'' म्हणून ती आपल्या घोडीशी गूज करते.

या मालनीच्या साजशृंगाराचाही नखरा काही न्याराच आहे. केशसंभाराचे त्यात कौतुक अमापच! बांगड्या, मंगळसूत्र, जोडवी, कुंकू यांच्या नाना तऱ्हा ! आणि साडी चोळीचेही किती प्रकार ! त्यात पुन्हा काळ्या चंद्रकळेचा थाट काही आगळाच! पैठणीचा मान मोठा .

आपल्या प्रणयाच्याही विविध छटा या ग्रामकन्या मोकळेपणाने ओव्यांमध्ये चितारतात. कधी सूचकपणे. कधी उघडपणे. पाणवठ्यावर जाऊ या . गोपीला जसा कृष्ण सखा भेटला तसा कुणी आपल्यालाही भेटेल अशी स्वप्ने ही मालन रंगवते.

पान्याला जाऊ गड्या गळी सोनीयाची सरी
आवळ झालं भारी पडती, ग भुजीवरी
झाला उशीर उशीर वाट सोडा किस्नदेवा..''

काही ओव्यांमध्ये पितळी पलंग आणि रंग महालांची वर्णने येतात.

पितळी पलंग तेच्या भवताली जाळी
कोन भाग्याची चापेकळी
...
माडीवर माडी तिचा गिलावा लाल लाल



नटका भरताराचा हौशाचा रंगमहाल...
गाडे भरताराचं सुख फाटी सांगते अंगनी
बाई,ते,आयकून हसं नाजूक चांदनी...

पहिल्यांदा गरोदर राहिलेल्या मालनीचे कौतुक तिची सासू करते. ''पयिल्यांदा गरोदरपण तिच्या तोंडावर लाली.'' गरोदरपणाच्या आठ नऊ महिन्यातील अवस्थांचे वर्णन करणारीही एक गाथा यात आहे. पहिल्या तीन ओव्यात डोहाळ्यांचे तर पुढे सरीपूजन, बांगड्या भरणे, वनभोजन, माहेरला पाठवणी, इकडे सासूच्या मनाला लागून राहिलेला घोर यांचे वर्णन आले आहे.

लेकीचा जन्म, सासुरवाशीण, स्त्रीसुलभ शिष्टाचार, सासरी होणारी उपासमार (भूक लागली पोटाला, धीर धर भूकबाई, परावं हे घर हितं आपली बया न्हायी), नणंदा-जावा आणि सासरे-दीर यांची बोलणी, कामाचा रगाडा, (कामाच्या कसाल्यात उचलीना मी पापनी, देर गुजराची मला वाघाची जाचती), अहे व मरणाची आकांक्षा - वगैरे भाव या गाथांतून प्रकट होतात; त्या वाचताना जीव गलबलतो. आपल्याला अहेव मरण यावे, तेही सोमवारी यावे, वाजंत्री बोलवून हिरवे लुगडे नेसवून, पतीच्या शेल्याच्या पदरात ओटीचे सामान बांधून आपली अंत्ययात्रा निघावी अशी इच्छा एका गाथेत व्यक्त झालेली आहे.


अहेव मरणाची मला ग लयी हौस
मागनं येतं गोत पुढं कुंकाचा पाऊस ॥
अहेव मरणाचा उजेड पडला सव्वा कोस
म्हनी माझा नेनंता, ग नगर पडलं वोस ॥

इंदिराबाई या सगळ्या मरणगाथा देऊन भाष्य करतात, ''अशी ही मालनींची अंतकाळीची संवेदने... त्यांच्या सोशिकपणा किती खोल आहे हे दाखवणारी. मरणसोहळा हा कितीही सुखकारक असला तरी तो सरणाच्या ज्वालांतून निर्माण झालेला... आणि त्याची मुळे मालनींच्या जीवनातल्या विविध समस्यांतून रुजून आलेली... या गाथा वाचल्या म्हणजे मृत्यूची टांगती तलवार मालिनींच्या वर सतत लटकत असते असे म्हणण्यापेक्षा जीवन जगणे हेच त्यांचे असिधाराव्रत असते, असे म्हणावेसे वाटते. या असिधाराव्रतातून सुटण्यासाठीच जिवंतपणी त्या मरणाची स्वप्ने बघत असाव्यात.''

''अवघ्या स्त्रीजीवनाला स्पर्श करणाऱ्या या ओव्या, न्हाणवलीच्या सुखद सोहळ्यापासून मरण वेळेपर्यंत, शृंगार रसापासून ईश्वराशी जडलेल्या सौहार्दरसापर्यंत, पुत्रजन्मापासून वैधव्याच्या आकान्तापर्यंत जे जे म्हणून स्त्रीला भावले ते ते सर्व आपल्या कवेत लीलया घेतात.'' या ओव्या म्हणजे अनुभवामृताचे एक अथांग मानस सरोवर असे इंदिरा संत म्हणतात. ते यथार्थच आहे.

'मालनगाथा' मधून प्रकट होणारे ग्रामीण स्त्रीचे अंतरंग हे वास्तव तर आहेच; ते जीवनातील सुखदु:खाचा जाणीवपूर्वक स्वीकार करणारेही आहे. या ओव्यांची निर्मिती करणाऱ्या स्त्रीमनाची प्रगल्भता क्षणकालही नजरेआड होऊ शकत नाही. या स्त्रिया साक्षर नसतील; पण त्या अडाणी नक्कीच नव्हत्या; आयुष्याच्या विशाल पाठशाळेत त्यांनी मिळवलेल्या अनुभवाचे भांडार हे आपल्या पुस्तकी कक्षांत सामावणे अवघडच!

**पृष्ठे : २८९ किंमत : २००रु. सभासदांना :१५०रु. पोस्टेज :२५रु.**




**स्वत:च्या आयुष्याला हवा तसा आकार देण्याचे आत्मबळ प्रकट करणारी मनस्विनी**

# महाश्वेता

**डॉ. सुधा मूर्ती**
**अनु : उमा कुलकर्णी**

इन्फोसिस या अग्रगण्य सॉफ्टवेअर कंपनीचे प्रवर्तक नारायण मूर्ती यांच्या पत्नी डॉ.सुधा मूर्ती यांनी कानडी साहित्यात स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. त्यांचा जन्म धारवाडचा. वडील डॉक्टर. माहेरचे आडनाव कुलकर्णी. लहानपणची तीन चार वर्षे त्यांनी कोल्हापूर - कुरुंदवाड मध्ये काढली आहेत. पुढेही टेल्कोमधील नोकरीच्या निमित्ताने आठ वर्षे त्यांचे वास्तव्य पुण्यात होते. पुण्यातच नारायण मूर्ती यांच्याशी स्नेह जुळला आणि पुण्यातच 'इन्फोसिस' च्या स्थापनेसाठी त्यांनी आपले दागिनेही दिले.

मातृभाषा कानडी असली तरी मराठी त्यांना चांगली अवगत आहे. परंतु त्यांचे लेखन मूळ कानडीतच होते. कानडी कादंबरीक्षेत्रात एम.के.इंदिरा आणि त्रिवेणी या दोन लेखिका लोकप्रिय गणल्या जातात. त्या मागोमाग आता सुधा मूर्ती यांनी स्थान पटकावले आहे.

डॉलर बहू, महाश्वेता, तुमुला, अहिरीक्ते, अव्यक्ते, यशस्वी, रूना या त्यांच्या कादंबऱ्या व समानयरर्ली असमानयास हा कथासंग्रह याद्वारे त्यांनी समकालीन मध्यमवर्गीय व उच्चभ्रू कुटुंब जीवनातील पडझडीचा वेध वेगवेगळ्या पैलूंमधून घेतला आहे.

'डॉलर बहू' या कादंबरीवर तर दूरचित्रवाणीवर एक मालिकाही सादर करण्यात आली. वाईझ अँड अदरवाईझ हा लेखसंग्रहही इंग्रजीत प्रसिद्ध झाला असून, त्यांच्या बहुतेक पुस्तकांची भाषांतरे इंग्रजी व अन्य भाषांमध्ये झालेली आहेत. संगणकाची मूलतत्त्वे, इंटरनेट, ई कॉमर्स यावरील त्यांची पुस्तकेही बेस्ट सेलर ठरली आहेत. इन्फोसिस फाउंडेशनद्वारे त्या लाखो रुपयांचा निधी समाजोपयोगी उपक्रमांसाठी उपलब्ध करून देतात. गाव तेथे ग्रंथालय या उपक्रमाद्वारे कर्नाटकातील शेकडो गावात त्यांनी वाचन संस्कृती परिवर्धित केली आहे.

महाश्वेता या कादंबरीची नायिका अनुपमा ही लग्नानंतर अंगावर पांढरे डाग दिसू लागल्याने 'सासर' ला मुकते आणि मुंबईत येऊन स्वावलंबी जीवन निर्धाराने जगते. या नायिकेच्या रूपाने कोडग्रस्त स्त्रीच्या जीवनातील ताणतणाव दाखवण्यात आले आहेतच; पण त्यापेक्षाही अधिक



## पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

- 'इन्फोसिस फाउंडेशन'च्या प्रमुख सुधा मूर्ती यांच्या गाजलेल्या कन्नड कादंबरीचा अनुवाद
- सुंदर कॉलेजकन्या अनुपमा आणि तिच्यावर भाळलेला गर्भश्रीमंत आनंद यांचा विवाह होतो खरा; पण सासरी तिला सतत टोमणेच खावे लागतात.
- तशातच तिच्या अंगावर कोडाचे डाग दिसू लागतात आणि तिच्या जीवनाला कलाटणी मिळते.
- अनुपमा त्यातून धीरोदात्तपणे कसा मार्ग काढते ?

प्रकाशझोत हा अशा व्यक्तींबाबत कुटुंबातील व समाजातील वेगवेगळे घटक जी पूर्वग्रहदूषित दृष्टी दाखवतात तिच्यावर टाकला गेला आहे. जुन्या वळणाची सनातनी सासू आणि ग्रामीण परिसरातील माणसे आजही 'कोड' झालेल्या व्यक्तीकडे तुच्छतेने पाहतात. कोड हे आनुवंशिक नव्हे हे लक्षात न घेता कोडग्रस्त व्यक्तीला वाळीत टाकल्यासारखे वागवतात. कोडग्रस्तांना संततीही तशीच होईल असे भय बाळगतात. देवघरात जाण्यास मज्जाव करतात. त्यांच्या हातचे काही खाण्यापिण्याचे टाळतात. जगणे अशक्य करून सोडतात. हे जनमानसातले समज-गैरसमज सुधा मूर्ती यांनी केंद्रीभूत ठेवून अनुपमा या नायिकेची व्यक्तिरेखा उभी केली आहे आणि मुंबईच्या महानगरीत अशा व्यक्तीलाही सन्मानाने जगता येते असे दाखवून, दिलासा दिला आहे.

'कोड' वगळले तर अनुपमा ही खरोखर एक सौंदर्यसंपन्न, सुशिक्षित व कार्यक्षम आहे. दिसायला अत्यंत सुंदर, गौरवर्णीय, अभ्यासात हुशार. सर्वांना प्रिय. संस्कृत नाटकांची आवड असणारी. कोणावरही प्रथमदर्शनीच छाप पाडणारी.

तिचे वडील साधे शाळामास्तर. गरीब. घरी सावत्र आई व सावत्र बहीण.

डॉ. आनंद हा गडगंज श्रीमंत तरुण तिला पाहतो आणि तिच्यासाठी वेडा होतो. त्याची आई राधक्का - आणि बहीण गिरिजा - दोघेही आपल्या श्रीमंतीचा दिमाख मिरवणारे. रुपाया नारळावर आपल्या मुलाने एका गरीब मुलीशी लग्न करावे हे त्यांना आरंभी रुचतच नाही; पण मुलाच्या हट्टापुढे त्यांचे काही चालत नाही. गरीब सुनेचा सतत पाणउतारा करण्यातच त्यांना धन्यता वाटते.

डॉ.आनंद लग्नानंतर लगेचच पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला जातो. अनुपमाला नंतर पाचसहा महिन्यांनी बोलावून घेईन असे म्हणतो. तोपर्यंत सासरी राहण्यावाचून गत्यंतरच नसते. तशात एके दिवशी पायावर निखारा पडून तिला भाजते. जखम बरी होते पण पायावर पांढरा डाग राहतो. तो वाढतच जातो तेव्हा अनुपमा धास्तावते. सासूच्या नकळत त्वचा रोगतज्ज्ञाकडे जाते. 'हे पांढरे कोडच आहे' यावर शिक्कामोर्तब होते. उपचार सुरू होतात... एके दिवशी सासू राधक्काच्या

लक्षात ते येते आणि तिचा छळ सुरू होतो. लग्नाआधीचाच हा डाग असणार, तू आम्हाला फसवलेस म्हणून दोषारोप सुरू होतात. तिच्या वडलांना तार पाठवून बोलवण्यात येते.''या पांढऱ्या डागाच्या मुलीला आपल्या घरी घेऊन जा'' असे सांगण्यात येते.

आणि अनुपमाला आपल्या माहेरी परत येणे भाग पडते.

ती नवऱ्याला पत्र लिहिते. पण त्याचे उत्तरच येत नाही.

तिच्या सावत्र बहिणीचे जमत आलेले लग्न तिच्या कोडामुळे मोडते. त्यामुळे तिची सावत्र आईही तिच्यावर रुष्ट असते.

आपण बी. एड. करून शिक्षिका व्हावे असा विचार ती करते. पण सुमन नामक मैत्रिणीच्या सांगण्यावरून ती मुंबईला येते. एका ऑफिसमध्ये ती रिसेप्शनिस्ट म्हणून नोकरीला लागते. मैत्रिणीकडेच काही दिवस राहते. सुमन परगावी गेली असताना तिचा नवरा हरीप्रसाद अनुपमाशी लगट करू पाहतो तेव्हा ती ऑफिसमधल्या डॉली नावाच्या मैत्रिणीच्या घरी पेइंग गेस्ट म्हणून राहू लागते. डॉलीबरोबर तिची आई राहत असते. तेथे राहत असताना एका कॉलेजमध्ये संस्कृतच्या प्राध्यापकाची नोकरी तिला मिळते. डॉली लग्न करून नवऱ्याबरोबर परदेशी जाते; पण आपली जागा अनुपमाला राहण्यासाठी ठेवून जाते. आम्ही परत येईतो तू येथेच राहा असे सांगून जाते.

एकदा अनुपमाला रस्ता क्रॉस करताना टॅक्सीचा धक्का लागतो. पायाला फ्रॅक्चर होते. डॉ. वसंत व डॉ.सत्यप्रकाश हे दोघे तिच्यावर इलाज करतात. त्यांच्याशी तिची घसट वाढते. ते दोघेही अविवाहित असतात... आपल्या खेड्यात जाऊन लोकांना वैद्यकीय सेवा द्यावी असे ध्येयवादी डॉ.वसंताला वाटत असते . तो तिला विचारतो, ''तू माझ्याबरोबर खेड्यात राहू शकशील का?'' पण ती मला महिनाभर विचार करू दे असे सांगून त्याच्या प्रश्नाचे उत्तर देणे टाळते...

डॉ. आनंद भारतात परत आल्यावर अनुपमाचा शोध घेतो. आई त्याला सांगते, ''कोड बरे झाल्याशिवाय अनुपमाला मी घरात पाऊल टाकू देणार नाही.'' उलट ती दुसरं लग्न कर म्हणून त्याच्या मागे लागते. पण तो तिला धुडकावून लावतो.

अनुपमाचे वडील बदलून दुसऱ्या गावी जातात. त्यामुळे आनंदला त्यांचा ठावठिकाणा शोधणे अवघड जाते. परंतु तो एका वैद्यकीय परिषदेसाठी मुंबईला येतो तेव्हा एका संस्कृत नाटकात अनुपमाला पाहतो आणि तिला भेटतो. अनुपमाला तो म्हणतो,''माझं चुकलं असेल तर मला क्षमा कर, जे घडलं ते विसरून जा.'' तेव्हा अनुपमा त्याला अनेक प्रश्न विचारते. ''मला कोड आलं यात माझा दोष काय? गरिबाघरची मुलगी करून घेऊन तिच्या गरिबीची टर उडवणं यात कुणाची चूक? मला लग्नाआधी कोड नव्हतं हे तुम्हाला ठाऊक होते. पण तुम्ही आईला तसं का नाही कळवलं ?'' त्यावेळी मला आपुलकीच्या दोन शब्दांची गरज होती... मी तुमच्या पत्राची चातकासारखी वाट पहात होते.''

त्यावर डॉ.आनंद म्हणतो,''तू म्हणतेस ते खरं आहे. पण आमचाही विचार कर... हा रोग पुढच्या पिढीत आला तर अशी आईला भीती वाटत होती.''

''पण हे जर लग्नानंतर तुमच्या बाबतीत झालं असतं तर?... केवळ मला कोड आलं म्हणून मी माणूस आहे हेच तुम्ही विसरला... तुम्हाला कोड झाले असते तर मी तुम्हाला अशी वाऱ्यावर सोडून गेले असते का?''...



डॉ.आनंद तिला पुन्हा आपण एकत्र राहू या असे सुचवतो. तेव्हा मात्र ती त्याला साफ नकार देते. आता मला नवरा, प्रेम, माया, सर्व निरर्थक वाटतं. मला माझ्या जीवनाचं ध्येय गवसलं आहे. मला आता कुठल्याही आधाराच्या काठीची गरज नाही. मुंबईसारख्या महानगरानं मला अपार संरक्षण दिलं आहे. पण सगळ्या महाश्वेतांची परिस्थिती माझ्यासारखी नाही. ज्यासाठी आपण कुठल्याही अर्थी जबाबदार नाही, त्यासाठी परित्यक्तेचं जीवन वाटचाल आल्यामुळे माझं मन आक्रंदून उठतं...''

आणि 'परस्त्रीला एकेरी नावानं हाक मारणं योग्य नव्हे' असे म्हणून ती त्याला धुडकावून लावते.

डॉ. वसंतलाही ती सांगते, ''मला हा संसार, नवरा, घर, मुलं, आई, भावंडं ही सगळी नाती खोटी वाटताहेत. मला संसाराच्या जंजाळात अडकण्याची मुळीच इच्छा नाही... तुम्ही तुमच्या गावी जा... मला मुंबईच प्रिय आहे. इथं केवळ माणुसकीची ओळख पटते. जाती, पंथ, भाषा यापेक्षाही डॉलीनं माझ्यावर विश्वास ठेवला, हे घर माझ्यावर सोपवून ती निघून गेली. हे इतर कुठल्या गावात शक्य आहे?... माझी आवडती शिक्षिकेची नोकरी, माझे विद्यार्थी, माझी आवडती रंगभूमी... माझा हाच स्वर्ग आहे... मी फार पुढचा विचारच करीत नाही... आपल्या दोघांमधला स्नेह लग्नात रूपांतरित होऊन संपून जायला नको...''

अनुपमा आपल्या महाविद्यालयीन जगात व नाटकाच्या जगात आपलं सर्वस्व गवसल्याप्रमाणे रमण्याचा निर्धार प्रकट करून स्वत:च्या संसाराची कल्पना फेटाळून लावते.

...सुधा मूर्ती यांनी अनुपमाच्या रूपाने एका आत्मनिर्भर, सत्वशील मानिनीची व्यक्तिरेखा पेश केली आहे. कोड झाल्यामुळे ती पती, सासर, यांना दुरावते... तरीही ती स्वत:च्या जीवनाचा मार्ग शोधून काढते आणि त्यावर ठाम पाय रोवून उभी राहते.


पती वा मुलेबाळे यात तिला नंतर स्वारस्य उरत नाही सर्व नातीच निरर्थक व भुसभुशीत वाटू लागतात. त्यापेक्षा मैत्रीचे नाते हेच तिला अधिक विशुद्ध व आश्वासक असल्याचे जाणवते.

सुधा मूर्ती यांनी अनुपमाला एका विशिष्ट चौकटीत आधी जखडून नंतर मुंबईसारख्या महानगरीतच खऱ्या मुक्ततेचे वातावरण मिळवून देऊन स्वत:चा आत्मसन्मान प्रस्थापित करण्यास अवसर दिला आहे.

लग्न, नवरा, संतती या सर्वांना धुडकावून लावून, आपला स्वतंत्र पण एकाकी मार्ग अनुपमा चोखाळू पाहते.

'कोड' हे दुराव्याचे एक निमित्त होते. कोडा ऐवजी अन्य काहीही कारण येऊ शकते; आणि त्यामुळे पतिपत्नीमध्ये दुरावा निर्माण होऊ शकतो. अशा वेळी स्त्रीने आपल्या आत्मप्रतिष्ठेचा मार्ग चोखाळण्याची हिंमत दाखवायला हवी, असा संदेश ही कादंबरी देऊ पाहते. कौटुंबिक सुरक्षिततेचा बाऊ न करता किंवा शारीरिक संबंधांची अपेक्षा न धरता आपल्या आवडीच्या क्षेत्रात स्वत:ला झोकून देऊ पाहणाऱ्या आधुनिक स्वयंसिद्ध महिलांची प्रतिनिधी म्हणून अनुपमा ही नायिका वाचकांना अंतर्मुख करीत राहील.

**पृष्ठे : १४८ किंमत : १२०रु. सभासदांना : ९०रु. पोस्टेज :२०रु.**




## श्री. पु. भागवत यांना 'चतुरंग' चा जीवनगौरव पुरस्कार

'चतुरंग प्रतिष्ठान' या संस्थेने यंदाच्या सांस्कृतिक जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ साहित्यिक-प्रकाशक श्री.पु.भागवत यांची निवड केली आहे.

वाङ्मयीन संस्कृतीच्या वृद्धीसाठी आयुष्यभर केलेले अथक प्रयत्न, निष्ठापूर्वक जपलेली जीवनमूल्ये, वाङ्मयीन कलाकृतीच्या दर्जाचा आग्रह, विचक्षण संपादनदृष्टी, विचारप्रगल्भ व निश्चित अशा सांस्कृतिक व वाङ्मीयन दृष्टिकोनामुळे आधुनिक मराठी साहित्यात निर्माण केलेले नवनवे मापदंड, वर्षानुवर्षाच्या अध्यापनातून विद्यार्थी-विद्यार्थिनींची वाङ्मयीन जाण अधिकाधिक प्रगल्भ करतानाच, 'मौज प्रकाशना'तील गेल्या ५२ वर्षांची वाङ्मयीन सेवा, अशा अनेक वैशिष्ट्यांची दखल घेऊन यंदाच्या जीवनगौरव पुरस्कारासाठी श्रीकृष्ण पुरुषोत्तम भागवत यांचे नाव निश्चित करण्यात आले. मानपत्र आणि सन्मानचिन्हासहित एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तो २१-२२ डिसेंबर रोजी होणाऱ्या चतुरंग संमेलनात प्रदान करण्यात येणार आहे.

'लोकसत्ता' चे संपादक डॉ. अरुण टिकेकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमध्ये वसुंधरा पेंडसे-नाईक, रवींद्र पिंगे, डॉ.विश्वास मेहेंदळे, निशिकांत जोशी, विनोद ला. दोशी व सौ.प्रफुल्ला डहाणूकर यांचा समावेश होता.

'चतुरंग' च्या 'जीवनगौरव पुरस्कारा' चे हे बारावे वर्ष असून सांस्कृतिक क्षेत्रासाठी यापूर्वी भालजी पेंढारकर (१९९१), पु. ल. देशपांडे (१९९४), सुधीर फडके (१९९६), बाबासाहेब पुरंदरे (१९९८) आणि लता मंगेशकर (२०००) यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

## 'वर्तमान जगण्यातील दुखरी नस पकडण्याच्या प्रयत्नाला दाद...'

''पृथ्वीच्या उत्पत्तीपासून ते आजच्या वर्तमानाच्या जगण्यातील दुखरी नस पकडण्याचा कसोशीने प्रयत्न 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा' या कवितेतून केला. कवितेला मिळालेल्या या पुरस्काराने त्यास मान्यता मिळाली,'' अशी प्रतिक्रिया कवी संतोष पद्माकर पवार यांनी दिली.

'अभिधानंतर' या वाङ्मयीन नियतकालिकाच्या काव्यलेखन स्पर्धेत त्यांच्या 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा' या दीर्घकवितेला २५ हजार रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला. ''मराठीतील मान्यवर कवीसमीक्षकांनी माझ्या कवितेची निवड केली याचा खूप आनंद झाला. मी ग्रामीण भागातील आहे. तिघे परीक्षक वेगवेगळ्या बांधिलकीशी जोडलेले आहेत. तरी त्यांचे माझ्या कवितेबाबत एकमत व्हावे यात या कवितेचे यश आहे.'' ''पृथ्वीच्या उत्पत्तीपासून ते आजच्या वर्तमानाच्या जगण्यातील दुखरी नस पकडण्याचा मी माझ्या कवितेतून कसोशीने प्रयत्न केला; त्याला या पुरस्काराने मान्यता मिळाली. पारितोषिकाची रक्कम मोठी असली तरी या कवितेतील विचार मराठी वाचकांपर्यंत



पोचविण्याचे एक माध्यम म्हणून ही स्पर्धा मला उपयोगी पडली. नगरच्या सत्तराव्या साहित्य संमेलनातील 'कविता मला भेटली' ही माझी कविता गाजली होती. या कवितेची एक हजार भितिपत्रके त्या वेळी हातोहात विकली गेली. तसाच परंतु त्यापेक्षा अधिक सुखावणारा अनुभव या काव्यस्पर्धेने दिला आहे,'' असे त्यांनी सांगितले. गेल्या १२ वर्षांपासून संतोष पवार कविता लेखन करीत आहेत. 'कवितारती', 'शब्दालय', 'अनुष्टुभ', 'हंस', 'अक्षर', 'अभिधानंतर', 'स्रग्धरा', अशा दिवाळी अंकांतून, तसेच विविध वाङ्मयीन नियतकालिकांतून त्यांच्या कविता सातत्याने प्रकाशित होत असतात. संगमनेर तालुक्यातील सादतपूर येथे संतोष पवार ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहेत. कला शाखेची पदव्युत्तर पदवी घेतलेले पवार प्राध्यापक पात्रता चाचणी (सेट) परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. कबुली ही त्यांचा काव्यसंग्रह निघाला आहे.

## 'मौलिक मराठी चित्रगीते'ला सर्वोत्कृष्ट पुस्तक पुरस्कार

दिलीपराज प्रकाशनच्या 'मौलिक मराठी चित्रगीते' या गंगाधर महाम्बरे लिखित पुस्तकाला केंद्र सरकारच्या चित्रपट संचालनालयातर्फे देण्यात येणारा चित्रपटावरील सर्वोत्कृष्ट पुस्तकाबद्दलचा हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

सुवर्णकमळ व पंधरा हजार रुपये, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. मराठी पुस्तकाला प्रथमच हा पुरस्कार मिळाला आहे.

## बाळ ठाकूर, कमल शेडगे यांना कृ. रा. परांजपे गुणिजन पुरस्कार

परांजपे फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा कृ. रा. परांजपे गुणिजन कला पुरस्कार मुंबई येथील ज्येष्ठ चित्रकार बाळ ठाकूर व कमल शेडगे यांना जाहीर झाला आहे. एकवीस हजार रुपये व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

कलानिर्मितीसाठी नि:स्पृह वृत्तीने कार्यरत राहणाऱ्या व सकारात्मक कलाप्रवाहांना बळ देणाऱ्या ज्येष्ठ कलाकारांना हा पुरस्कार देण्यात येतो. श्री. ठाकूर हे सृजनशील असे बोधचित्रकार व डिझायनर आहेत. त्यांच्या रेखांकनप्रधान चित्रशैलीतील बोधचित्रे व मुखपृष्ठे गेली ४५ वर्षे मराठी नियतकालिकांची व ग्रंथांची शान वाढवत आहेत. ठाकूर यांनी सिस्टास लिमिटेड, अय्यर्स ॲडव्हर्टायझिंग आणि उल्का ॲडव्हर्टायझिंग या जाहिरात संस्थांत महत्त्वाचे योगदान दिले आहे.

शेडगे हे सुलेखन तज्ज्ञ व ग्राफिक डिझायनर आहेत. मासिकांची पृष्ठरचना हा त्यांचा खास प्रांत आहे. मासिकांचे कला दिग्दर्शन, मराठी नाट्यसृष्टीच्या जाहिराती, ध्वनिमुद्रिकांची वेष्टने, नवे अक्षर नमुने आणि व्यक्तिचित्रे या क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

पुरस्कार प्रदान सोहळा पुण्यात येत्या १९ ऑक्टोबर रोजी होणार आहे. याच दिवशी फाउंडेशनतर्फे शेडगे व ठाकूर यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. या आधी हा पुरस्कार ज्येष्ठ चित्रकार शिवाजी तुपे, भय्यासाहेब ओंकार, व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांना देण्यात आला होता.

## माडगूळकर कथाकथन स्पर्धेत विश्वनाथ गायकवाड प्रथम

माणदेशच्या ग्रामीण भागाला मराठी साहित्यात मानाचे पान मिळवून देणाऱ्या व्यंकटेश

माडगूळकर यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त आटपाडी येथे झालेल्या राज्यस्तरीय कथाकथन स्पर्धेत कवी प्रा. विश्वनाथ गायकवाड यांच्या 'चिवळ्याचं लगीन' या कथेला प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

माडगूळकर, शंकर पाटील, मिरासदार यांची कथाकथनपरंपरा जिवंत ठेवण्याच्या हेतूने आयोजिलेल्या या स्पर्धेत राज्यातील ५५ कथाकथनकारांनी भाग घेतला होता. स्पर्धेचा काळ व्यंकटेश माडगूळकर यांची जयंती सहा जुलै, ते पहिला स्मृतिदिन (२८ ऑगस्ट) असा होता; या दोन महिन्यांत दर शनिवारी स्पर्धकांनी आटपाडीत (जि. सांगली) येऊन कथाकथन केले; तर आठव्या शनिवारी अंतिम फेरी झाली. मानचिन्ह आणि पाच हजार रुपये रोख अशा स्वरूपाचे पहिले पारितोषिक प्रा. गायकवाड यांना; तर पंढरपूरचे श्याम सावजी ('मधुचंद्राची रात्र') आणि लोणंदचे प्रफुल्लकुमार कांबळे ('सह्याद्री') यांना दुसरे पारितोषिक देण्यात आले आहे. तिसरा क्रमांक शेटफळे येथील संभाजी गायकवाड ('कोंबडीची फिस्ट') आणि अहमदनगरचे श्रीराम देशमुख ('बाप') या दोघांना देण्यात आला; तसेच उत्तेजनार्थ पारितोषिकही बिळाशीचे बाळासाहेब परीट ('शिकारी') आणि धनगावचे शरद देशमुख ('कष्टाची भाकर') यांना विभागून मिळाला. अंतिम फेरीपर्यंत पोहोचलेल्या, लोणंद येथील कु. राजेश्वरी कांबळे आणि सांगोला येथील बाळासाहेब गोडसे यांना प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

### प्र.के. घाणेकर यांना देशपांडे पुरस्कार


"निसर्ग आणि मनुष्य यांच्यात आज दरी निर्माण होत आहे. अशा वेळी लोकांना निसर्गापाशी नेऊन आपल्या निसर्गाचा आपल्याशीच परिचय करून देण्याचे श्रेष्ठ काम प्र.के.घाणेकर निष्ठेने करीत आहेत," असे प्रतिपादन संरक्षण मंत्रालयाचे माजी वित्तीय सल्लागार भगवान जोशी यांनी केले.

'गुरुवर्य ल.ग.देशपांडे पुरस्कार' प्र.के.घाणेकर यांना देण्यात आला. "घाणेकर स्वत: गिरीभ्रमण करून किल्ल्यांची माहिती घेऊन हे ज्ञान निरपेक्ष वृत्तीने लोकांना देण्याचे काम करीत आहेत. अशा लोकांना पाहून निसर्गाविषयी वाटणारी मनातील निराशा दूर होते."

सत्काराला उत्तर देताना घाणेकर म्हणाले, "माझे खरे शिक्षण चार भिंतींच्या बाहेर झाले. प्रत्यक्ष अनुभवाद्वारे निसर्ग जाणून घेण्याची सवय शिक्षकांमुळे माझ्यात निर्माण झाली."

शरद बेलवलकर यांनी प्रास्ताविक केले. वि.व्यं.भिलवडकर यांनी आभार मानले.


## नवे.. कोरे..




वि.स.खांडेकर यांचे लेखन म्हणजे कालौघातही टवटवीत राहिलेली साहित्यफुले. 'रानफुले'या पुस्तकात मराठी लघुनिबंधाचे सारे रस, रंग, रूप, गंध, संगीत नि संवेदन वाचकाला अनुभवता येईल.

**रानफुले** संपा. सुनीलकुमार लवटे

किंमत **७०** **रू.**सभासदांना **५३ रू.** पोस्टेज **२०रु.**





# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ **ऑक्टोबर २००२**
◆ **वर्ष दुसरे**
◆ **अंक दहावा**

- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १० रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस


**— *अनुक्रमणिका* —**


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **विशेष लेख-शिवाजी सावंत** -डॉ.आनंद यादव | १९ |
| **विशेष लेख-वसंत बापट** - डॉ. संगीता बापट | २२ |
| **श्रद्धांजली** | २४ |
| **पुस्तक परिचय** | |
| मनावर विजय : अनु. वैशाली जोशी | २५ |
| निरामय यशासाठी ध्यान : शुभदा गोगटे | ३१ |
| त्रिवेणी : अनु. शान्ता शेळके | ३४ |
| मालनगाथा : २ : इंदिरा संत | ३८ |
| महाश्वेता : अनु. उमा कुलकर्णी | ४२ |
| **पुरस्कार** | ४६ |
| **नवी स्पर्धा** | ३३ |



मांडणी-अक्षरजुळणी : ***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंट्स्, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**

**वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

प्रति,

# वाचकांचा प्रतिसाद

सप्रेम नमस्कार,

स. न. वि. वि.

'नॉट विदाऊट माय डॉटर' : मराठी अनुवाद -लीना सोहोनी हे आपण प्रकाशित केलेले पुस्तक मला अंतर्बाह्य आवडले. 'करुण हाच एकमेव रस आहे', हे भवभूतीचे वचन इथे सार्थ झाले आहे. अनुवाद सरस आहे. पुस्तकाची मांडणी, छपाई व निर्मिती उत्कृष्ट आहे.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित
हेमन्त इनामदार
'संतोष', भारतीनिवास कॉलनी, ६०/१५, एरंडवणे, पुणे : ४

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

यांना सादर नमस्कार.

महाराष्ट्रामध्ये मराठी साहित्याच्या विकासासाठी आपण करीत असलेले प्रयत्न स्तुत्य आणि लक्ष्यवेधी आहेत. वाचन संस्कृती विकसित होण्यासाठी आपण राबवित असलेल्या प्रयत्नांना मोलाचे स्थान आहे. त्यादृष्टीने आपले प्रकाशन सतत धडपडत असते. मराठी पुस्तकांच्या विकास इतिहासात आपल्या प्रकाशनाचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल, अशी वस्तुस्थिती आहे.

'मेहता मराठी ग्रंथजगत' या मासिकाने अल्पावधीत वाचकांच्या जगात आपला असा खास ठसा उमटविला आहे.

आपली नवनवीन दर्जेदार पुस्तके परगावी आपल्या सभासदांना स्वत:च्यात गावी मिळावीत म्हणून मेंबर कार्ड देऊन तशी व्यवस्था करीत आहात, हे चांगले भरीव पाऊल आहे.

कळावे,

आपला
शिवशंकर उपासे
आजरा, जिल्हा कोल्हापूर ५.